# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

**संपादक**
डॉ. अशोक ढवळे

**कार्यकारी संपादक**
विजय पाटील

**संपादक मंडळ**
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर

**मुद्रक/प्रकाशक**
डॉ. अशोक ढवळे

**अक्षरजुळणी**
आत्माराम पडवळ

**मुखपृष्ठ व मांडणी**
केतन शिंदे

**व्यवस्थापक**
चंद्रकांत शिंदे

**प्रसिद्धी स्थळ**
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


संपादकीय

# वाण नाही पण...

कष्टकरी वर्गाशी अस्सल बांधिलकी नसेल तर राजकारणात शेवटी मी मी म्हणणारे कसे भ्रष्ट होतात, याची उदाहरणे सध्या चालू असलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचा निवडणुकीत रोज दिसू लागली आहेत. भाजप, शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या प्रमुख प्रस्थापित पक्षांनी राजकीय नीतीमत्ता केव्हाच गुंडाळून टाकली आहे. आणि त्याबद्दल आता जनताही अनभिज्ञ राहिलेली नाही. सत्तेसाठी कुणाशीही, कशीही चुंबाचुंबी करण्याला या पक्षांनी कसलाही धरबंद ठेवलेला नाही. या गावात जो मित्र असतो तोच शेजारच्या गावात शत्रू अशी राजकारणाची गत त्यांनी करून ठेवली आहे. अर्थात, जनतेच्या हितासाठी कारभारही त्यांच्या दृष्टीने इतिहासजमा झालेली गोष्ट आहे. हित असते केवळ स्वत:चे आणि स्वत:च्या कुटुंबियांचे. लोकशाहीच्या वारशातून या मंडळींनी लोकांना केव्हाच हद्दपार करून टाकून स्वत:च्या घराण्याची 'प्रायव्हेट लिमिटेड कंपनी' केली आहे.

अशा घराणेशाहीचा अर्क म्हणजे शरद पवार असल्याचे सांगत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या राजू शेट्टींनी त्यांना जेरीस आणले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस दरासाठी त्यांच्या दारातच नेऊन बसवले. लढाई शत्रूच्या अंगणात नेण्याची खेळी काही प्रमाणात यशस्वी झाली. अर्थात, त्याला काँग्रेसमधल्याच कित्येक सरदार - दरकदारांनी छुपी रसद पुरवल्यानेच शेट्टींचा बाणा जास्त लढाऊ बनला. या काँग्रेसवाल्यांचे गुण त्यांनी बघता बघता आत्मसात केले. ऊस दरासाठी, आपल्या शेतीमालाच्या रास्त दरासाठी त्यांच्याभोवती जमा झालेला शेतकरी तोंडात बोटे घालून पहातच राहिला. या निरनिराळ्या शेतकरी संघटना नावाच्या संघटनांनी राजकारणात 'जातीयवाद्यांशी' आपले संबंध कसे आहेत, हे नेहमीच गुलदस्त्यात ठेवले. पहिल्यांदा शरद जोशींनी 'जातीयवादी गिधाडे महाराष्ट्राच्या आकाशात संचार करू लागली आहेत', अशी आरोळी ठोकली. पण कालांतराने शेतकरी आंदोलनाच्या खिलार बैलाची गरीब गाय करून भाजपच्या दावणीला बांधली. त्याचक्षणी त्यांच्या तालमीत तयार झालेल्या राजू शेट्टींनी आपल्या गुरूविरुद्ध बंड करून आपण जातीयवाद्यांना कधीही शरण जाणार नाही, अशी गर्जना केली. धर्मनिरपेक्ष पवित्र्याचा त्यांना चांगलाच फायदा झाला. शेतकरी-कष्टकरी जनतेने आपला लढा मजबूत करण्यासाठी लोकसभेत पाठवले. डाव्या, लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष पक्षांच्या आघाडीतून ते निवडून आले.

पण आपल्या गुरूकडून, माननीय शरद जोशी यांच्याकडून, कमावलेले काही गुण त्यांनी झाकूनच ठेवले होते. बघताबघता त्यांनी जातीयवादी लांडग्यांच्या कळपात उडी मारली. मराठी शेतकऱ्याला 'लबाड लांडगं कसं ढ्वांग करत असतंय', हे चांगलेच ठाऊक आहे. पण बऱ्याचदा ते उशीरा कळते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत याचे प्रत्यंतर आले. 'शेतमालाच्या दरासाठी आपण स्वामीनाथन आयोगाची शिफारस स्वीकारू', असे खोटे आश्वासन देऊन मोदींनी राजू शेट्टींना गळाला लावले. या जातीयवादी गिधाडाचे शांततेचे प्रतिक असलेल्या कबुतरात रूपांतर झाल्याचा राजूशेट्टींना साक्षात्कार झाला. या साक्षात्काराची दीक्षा त्यांनी शरद जोशींच्याकडूनच घेतली असणार. आजवर राष्ट्रवादी काँग्रेस, अखिल भारतीय काँग्रेसमध्ये असलेल्या पण आता भाजपच्या असलेल्या कित्येक साखर आणि सहकार सम्राटांच्या मांडीला मांडी लावून ते बसू लागले. मोदींनी शेतकऱ्यांची मते मिळवून त्यांना हा हा म्हणता धोबीपछाड दिली. सर्वोच्च न्यायालयात 'स्वामीनाथन समितीच्या शिफारसी लागू करणे व्यवहार्य नाही', असे प्रतिज्ञापत्रच सादर केले. मोदींनी सत्तेच्या रसाने आपले कुंभ भरून घेतले आणि शेतकऱ्यांच्या हातात ऊसाचे चिपाड ठेवले. पूर्वी हातात ऊसाची दांडकी घेऊन मोर्चे काढणारे राजू शेट्टी आता हातात ऊसाची चिपाडे घेऊन सत्तेच्या जत्रेत सामील झाले.

माणूस सत्तेच्या घसरगुंडीला लागला की थांबता थांबत नाही, हेच खरे. राजू शेट्टी आणि आणि त्यांची संघटना हिकमती – करामती करून शेतकऱ्यांचा सोपान करून सत्तेचे मजले चढायची स्वप्ने पाहू लागले. भाजप – सेनेच्या भ्रष्ट, गिधाडी टोळक्यात सहभागी झाले. आणि व्हायचे तेच झाले. मंत्री केलेल्या सदाभाऊ खोतांनी आपले चावायचे दात दाखवायला सुरवात केली. लांडगा या कोकराला गोंजारू लागला. आपला एकमेव आमदार हातातून सुटतोय या भयाने खासदार शेट्टी भयग्रस्त झाले. त्यांनी आपल्याच सहकाऱ्यावर तोफ डागली. पण एकदा का तोंडाला रक्त लागले की ती चटक सुटत नाही. सदूभाऊंनी जिल्हा परिषदेला आपल्या चिरंजिवांनाच उभे करून आजवर लाठ्याकाठ्या खाल्लेल्या, खटले भोगणाऱ्या कार्यकर्त्यांच्या तोंडाला पाने पुसली.

राजू शेट्टींच्या अंगाचा तीळपापड झाला. त्यांनी सदूभाऊंवर 'घराणेशाही' चालवल्याबद्दल जाहीर तोफ डागली. वाटले, सदूभाऊ कोकरासारखे आपल्या कळपात पुन्हा सहभागी होतील. पण कसचे काय ? कुठे तरी माशी शिंकली आणि दस्तुरखुद्द शेट्टींनीच दुसऱ्या दिवशी टोपी फिरवली. मी काँग्रेसच्या घराणेशाहीविषयी बोललो, सदूभाऊंच्याविषयी नाही, अशी मल्लिनाथी त्यांनी केली. आपलेच विधान फिरवायचा, मी तसे म्हणालोच नाही, हा भांडवली पक्षाचा गुणही त्यांनी जाता जाता आत्मसात केल्याचे दाखवून दिले. वाणाचे ठाऊक नाही, पण सत्ताधारी वर्गाचे गुण मात्र आपल्या अंगाअंगात मुरत असल्याचे त्यांनी दाखवले आहे. आपल्या चाणाक्ष शेतकऱ्याच्या नजरेतून हे सुटायचे नाही. ★ ★ ★

# दबावतंत्राचे बळी

जयती घोष

भारतीय लोकशाहीच्या मार्गक्रमणाकरता अनेक महत्वाच्या संस्थांचे खंबीर होणे आवश्यक आहे. मात्र, आज परिस्थिती अशी आहे की, या संस्थांनी सरकार दरबारी गुडघे टेकल्यामुळे, या संस्था आपली विश्वासार्हता गमावून बसल्या आहेत.

या महत्त्वाच्या संस्थांमध्ये सत्ताधाऱ्यांना न घाबरता सत्य बोलण्यास धजणारे कोणी उरलेच नाही की काय ? लोकशाहीचा आधार स्तंभ असणाऱ्या अनेक संस्थांच्या विश्वासार्हतेचा दर्जा गेल्या वर्षी ज्या प्रमाणात घसरला, ते केवळ निराशाजनक नाही तर भीतीदायक आहे. हे खरे आहे, की काँग्रेस पक्षानेही, या संस्थांना फारशी आदरपूर्वक वागणूक दिली नाही.मात्र, अपवादात्मक परिस्थितीत, म्हणजे ज्या वेळी त्यांना असे करणे भाग पडले, त्या वेळी तरी काँग्रेसने हा आदर दाखवला आहे. डब्ल्यू. एच. ऑडेन यांनी केलेल्या यथार्थ वर्णनाप्रमाणे भारतात आज या अनादराने ऐतिहासिक नीचांक गाठला आहे.

या समस्येच्या मुळाशी मतभेद व्यक्त न करू देणारे, तसेच आपल्याला मान्य असणाऱ्याच सत्याचा कोष स्वत:भोवती विणून घेणारे मोठ्या प्रमाणावरील राष्ट्रीय नेतृत्व आहे. आणि एकदा का हा कोष विणला गेला की, प्रसारमाध्यमांचा प्रभावी वापर करून त्याच कोषात जनतेला गुरफटून टाकण्याचा या नेते मंडळींचा कावा आहे. मात्र ही धुसफूस एवढ्यापुरतीच मर्यादीत नाही. लोकशाही व्यवस्था केवळ नेता किंवा सरकार यांच्या इच्छेवर चालत नाही. इतर संस्था प्रमुखांची देखील, संस्थेचे इतर घटक व पर्यायाने सबंध समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी विसरून सरकारचीच री ओढण्याची इच्छा असेल तर हिच खरी समस्या आहे. भारतात तर अधिकाऱ्यांचा उपमर्द करण्याची दीर्घकालीन परंपरा आहे. मात्र या देशात, अत्यंत सचोटीने वागून आपले स्वातंत्र्य, पदाचा मान तसेच आपण काम करीत असलेल्या संस्थेचाही सन्मान कायम राखून कोणापुढेही मान न तुकवणाऱ्या तेजस्वी नेत्यांची उदाहरणेही कमी नाहीत.

खेदाची बाब अशी आहे की, असा स्वतंत्र बाणा, किंवा सत्य बोलण्याचे किमान धाडस दाखवणेही लोप पावत चालले आहे. जवळपास सर्वच प्रमुख संस्था सरकारच्या मर्जीनुसार वाकू लागल्या आहेत. यापैकी काही संस्था प्रमुख असे आहेत, ज्यांची सरकारी मर्जी राखण्याची व स्वामिनिष्ठा दाखवण्याची अगदी लगबग बघूनच, त्यापैकी अनेकांना सरकार दरबारी त्वरेने रुजू करून घेण्यात आले. भारतीय इतिहास संशोधन संस्था, फिल्म आणि टेलीव्हिजन इन्स्टिट्यूट या संस्था, तसेच सांस्कृतिक आदानप्रदान व संगीत नाटक अकादमी या सांस्कृतिक संस्था. या संस्थांमधील अलिकडच्या नेमणुका बघता या दाव्यातील तथ्य सहज कळून येते.

दुर्दैवाने, देशाच्या न्यायप्रणालीत महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या संस्थाबाबत हे घडले आहे. यूपीए सरकारच्या कार्यकाळात विरोधी पक्षनेते, विशेषत्वाने भारतीय जनता पक्षाचे नेते, काँग्रेस पक्षावर केंद्रीय गुप्तचर खाते हा पक्ष आपल्या राजकीय स्वार्थासाठी वापरत असल्याचा आरोप करीत असत. मात्र आज परिस्थिती अशी आहे की, भाजप याच मार्गाचा त्याहूनही मोठ्या प्रमाणात वापर करून आपला राजकीय अजेंडा पुढे दामटत आहे. याच मार्गाने जाऊन विरोधकांचा आवाज बंद करण्याचाही ते प्रयत्न करीत आहेत. यामुळे गुप्तचर खात्यावर तर आपली पत गमावण्याची नामुष्की ओढवण्याची वेळ आली आहे.

हा रोग आता सर्वदूर पसरू लागला आहे. अगदी वित्तीय संस्थादेखील यातून सुटल्या नाही. खरं तर या संस्था कुठल्याही राजकीय मत प्रवाहापासून अलिप्त असायला हव्यात. मात्र त्यांच्यावर राजकीय रंग चढल्यामुळे त्यांची सामाजिक पत व विश्वासार्हता घसरत चालली आहे. रिर्झव्ह बँक ऑफ इंडियाची निश्चलनीकरणातील भूमिका, हे या क्षुद्र राजकीय स्वार्थाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. केंद्रीय बँक ही पूर्णपणे स्वतंत्र राहू शकत नाही, कारण आर्थिक धोरण हे देशाच्या संपूर्ण अर्थशास्त्राचाच भाग आहे पण यावेळी रिर्झव्ह बँक स्वानुमतीने सरकारच्या हातातले एक संपूर्णपणे सहाय्यक राजकीय साधन बनले आहे.

भारताची मध्यवर्ती बँक म्हणून सबंध अर्थव्यवस्थेला चलनाचा, विशेषत: चलनी नोटांचा पुरवठा करणे तसेच त्यावर लक्ष ठेवणे, ही प्रामुख्याने रिझर्व्ह बँकेची जबाबदारी आहे. खरं तर, चलनी नोटा म्हणजे एक प्रकारे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरने दिलेल्या प्रॉमीसरी नोट्स(वचन) असतात. असे असूनही नोटाबंदी प्रकरणाने हे स्पष्ट केले, की रिझर्व्ह बँक सरकारची रुपयात बरोबरीची तर सोडाच पण केवळ काही आण्यांची भागीदार आहे. ज्या प्रकारे निश्चलनीकरणाच्या अंमलबजावणीदरम्यान टोकाचे निर्णय घेण्यात आले, त्यात वारंवार मूर्खासारख्या चुका झाल्या, नंतर ते निर्णय वेळोवेळी बदलण्यात आले, हे सर्व बघता हे निर्णय घेणारी मंडळी व्यावसायिक नव्हती, हे उघड आहे. व्यावसयिक बँकर्स व रिझर्व्ह बँकेच्या बोर्डावरील तज्ञमंडळींचा जर या निर्णयात योग्य तो सहभाग असता, तर असा महागोंधळ नक्कीच झाला नसता.

सध्या रिझर्व बँकेचा कारभार, हा कित्येक स्वतंत्र प्रभार असलेल्या संचालकांच्या जागा न भरताच सुरु आहे. त्यामुळे सरकारी प्रतिनिधींच्या तुलनेत ही स्वतंत्र संचालक मंडळी अल्पमतात आहेत. असे म्हणतात की, आठ नोव्हेंबरला दुपारी बँकेच्या बोर्डाची बैठक झाली आणि त्यात हा ५०० आणि १००० च्या नोटा बंद करण्याचा 'निर्णय' घेण्यात आला. मात्र सत्य तर असे आहे, की, पंतप्रधानांनी हा निर्णय जाहीर करण्याकरता दूरदर्शनवर आठ नोव्हेंबरच्या रात्रीची वेळ आधीच घेऊन ठेवली होती. या परिस्थितीत अनेक प्रश्न उपस्थित होतात. बँकेच्या बोर्डावरील एकाही अधिकाऱ्याला, किमान गव्हर्नरला इतक्या कमी मुदतीत बदली नोटा पुरवता येणार नाहीत आणि जर या नोटांचा पुरवठा झाला नाही तर त्याचा अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल, इतके सांगण्याचे धैर्य दाखवता आले नाही ? की यापैकी प्रत्येकाला ही खात्री होती की, अशा पद्धतीने नोटाबंदी केल्यास काळा पैसा संपुष्टात येईल ? आणि जर ही खात्री नसेल, तर यापैकी कोणीही आपली शंका का बोलून दाखवू शकले नाही ?

या संपूर्ण योजनेचे अधिकृत प्रमुख, रिझर्व बँकेचे गर्व्हनर यांनी तर

जवळपास महिनाभर अत्यंत संशयास्पद रीतीने मौन बाळगले. हे मौन त्यांनी सोडले ते एकदम ७ डिसेंबर २०१६ ला, ते देखील आर्थिक धोरणाचा आढावा घेणाऱ्या समितीच्या बैठकीनंतर पत्रकारांना सामोरे जाताना! त्यावेळीही त्यांनी अत्यंत सुमार विधाने केली. त्यावेळी देखील आरबीआयच्या नोटाबंदीविषयी अधिकृत घोषणा या त्यांची स्वत:ची भूमिका नव्हे, तर केवळ सरकारी नियमांत होणारे बदल दर्शवणाऱ्याच होत्या. परिणामी रिझर्व बँकेची नाचक्की तर झालीच, पण त्याहूनही गंभीर परिणाम झाला, तो म्हणजे जनतेचा ही मध्यवर्ती बँक व बँक प्रणाली यावरचा विश्वास उडाला. आणि याचे समाजावर व अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन गंभीर परिणाम होऊ शकतात.

यानंतर राजकीय दबावाचा ताजा बळी ठरली आहे ती म्हणजे केंद्रीय सांख्यिकी आयोग, ही संघटना! या संस्थेत अनेक व्यावसायिक अर्थतज्ञ तसेच संख्या शास्त्रज्ञ यांचा भरणा असल्यामुळे, ते हा राजकीय दबाव योग्य प्रकारे हाताळू शकतील, असे वाटत होते. मात्र आता हाती आलेल्या माहितीनुसार या संस्थेने सरकारद्वारे केलेल्या सकल घरेलू उत्पन्नाचा अंदाज नेहमीप्रमाणे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात वर्तवण्याऐवजी, एक महिना आधी म्हणजे जानेवारी महिन्यातच वर्तवावा, या मागणीला पूर्वीच मंजुरी देऊन टाकली आहे. त्यामुळे सरकारला आपला केंद्रीय अर्थसंकल्प एक महिना आधी, म्हणजेच १ फेब्रुवारीला सादर करणे शक्य झाले

पाच राज्यांतील फेब्रुवारी महिन्यापासून सुरु होणाऱ्या विधानसभा निवडणुका लक्षात घेता, तारखांच्या या फेरबदलाचे राजकीय परिणाम काय होतील, हे लवकरच स्पष्ट होईल. मात्र केंद्रीय सांख्यिकी संस्थेने महिन्याभरापूर्वीच अंदाज वर्तवल्यामुळे, बरीच महत्वाची आकडेवारी त्यांना उपलब्ध होऊ शकली नाही . यामुळे त्यांनी आपले अंदाजाचे गणित चुकवले आहे. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला जर हा अंदाज जाहीर केला असता, तर त्यात कंपन्यांच्या तिसऱ्या तिमाहीतील (ऑक्टोबर ते डिसेंबर) आकड्यांची तसेच औद्योगिक उत्पन्नाचे आकडे व इतर क्षेत्रातील निर्देशांकाची माहिती मिळून जो योग्य अंदाज वर्तवता आला असता, तसे होऊ शकले नाही. आता वर्तवण्यात आलेला अंदाज, हा नाईलाजाने वर्षातील केवळ सहा महिन्यांच्या माहितीवर जाहीर करावा लागला आहे.

एरवी देखील अशा प्रकारची कामगिरी आदर्श जरी मानली नाही, तरी चालवून घेता आली असती. मात्र नोव्हेंबर महिन्यात जाहीर झालेल्या निश्चलनीकरणाच्या रूपाने अर्थव्यवस्थेला जो तडा गेला आहे, त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर, विशेषत: अनौपचारिक आर्थिक व्यवहारांवर अत्यंत विपरित परिणाम झालेला आहे. सांख्यिकी आयोगाने जरी ही अनौपचारिक, म्हणजे रोख व्यवहारांची उलाढाल ४५ टक्के धरून सकल घरेलू उत्पन्नाचा अंदाज काढला असला, तरी निश्चलनीकरणाचा परिणाम लक्षात न घेता हा अंदाज काढल्यामुळे हा अंदाज चुकू शकतो. या नोटाबंदीच्या परिणामांचा प्रभाव न ओळखता अंदाज बांधणे एका परिस्थितीत समजू शकते, मात्र तो कळूनही त्याकडे केलेले दुर्लक्ष, अपुऱ्या माहितीच्या आधारे अंदाज बांधणे हा शुद्ध भेकडपणा आहे. या बदलांचा परिणाम जाणून घेतल्याशिवाय आगाऊ अंदाज लावणे शक्य नाही,त्याकरता नेहमीप्रमाणे फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीपर्यंत थांबावे लागेल, असे स्पष्टपणे सांगणे जास्त नैतिक ठरले असते.

अर्थात, निश्चलनीकरणामुळे आलेले त्सुनामी वादळ नजरेआड करून सर्व क्षेत्रातील माहिती जाहीर करणे, हा काही सांख्यिकी आयोगाने स्वत:हून घेतलेला निर्णय नव्हता. ही माहिती जाहीर केल्यानंतर थोड्याच दिवसांत प्रमुख संख्याशास्त्रज्ञ टी.सी.ए. अनंत यांनी दिलेल्या मुलाखतीत, नवीन आकडेवारीमुळे जाहीर केलेल्या अंदाजात काही विशेष बदल होण्याची शक्यता पूर्ण फेटाळून लावली.

'आमचा सर्वसाधारणपणे असा अनुभव आहे, की ही सर्व प्रक्रिया बरीच स्थिर असून, आम्ही मुदतीच्या आधी वर्तवलेला अंदाज हा वस्तुस्थितीच्या बराच जवळ जाणारा आहे.' हे त्यांचे मत ग्राह्य धरणे एरवी सहज योग्य ठरले असते. यावर्षी मात्र ते ग्राह्य धरता येण्यासारखी परिस्थिती नाही, आणि त्याचे कारण फारच स्पष्ट आहे. तरीही आपल्या मतांना चिकटून राहण्याचा दुराग्रह धरणाऱ्या या आयोगाने या वर्षीची जीडीपी वाढ ही ७.१ टक्के इतकी दाखवली आहे, जी तितकीशी खरी नाही. यामुळे दुसऱ्या सहामाहीत फारशी घसरण झालेली नाही, असा चुकीचा निष्कर्ष निघतो.

यात या वर्षीच्या वेगळेपणामुळे दोन सहामाहीतील केवळ काही आकड्यांचे अंदाज चुकले म्हणून आश्चर्य वाटण्याजोगी परिस्थिती आली, असे नाही. तर , सांख्यिकी आयोग वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत गुंतवणुकीतील ही घसरण कमी होईल असा आशावाद बाळगून आहे, ही खरी आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट आहे. त्यांच्या अंदाजानुसार, स्थिर भांडवलाची निर्मिती एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान ४.४ टक्क्यांनी कमी झाली असली तरी ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०१७ दरम्यान ४.२ टक्क्यापर्यंत तिची वाढ होईल. हे खरे मानले, तरीही सबंध आर्थिक वर्षात ०.१६ टक्क्यांची घसरण नक्कीच असणार आहे. जरी सबंध वर्षाकरता केवळ पहिल्या सहा महिन्यांचे आकडेच ग्राह्य धरले असले, तरीही गुंतवणुकीतील घसरण ही होणारच. नोटाबंदीचा परिणाम जर ग्राह्य धरला असता तर ही घसरण फारच मोठी दिसली असती. नोव्हेंबर मध्ये गुंतवणूक प्रस्तावात ४० टक्के घट झाल्याचे आपल्याला माहितीच आहे, त्यामुळे या गुंतवणुकीला लक्षणीय पुनरुज्जीवन द्यायचे तर सार्वजनिक गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर व्हायला हवी. किंवा या सांख्यिकी आयोगाला अशी काही विशेष माहिती तर नाही ना जी तुम्हा-आम्हाला नाही ?

कुठल्याही परिस्थितीत या संख्याशास्त्रीय विश्लेषणाचे राजकीय परिणाम तर होणारच. आयोगाच्या म्हणण्यानुसार गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात जीडीपी वाढ जी ११ टक्के होती, ती या वर्षी किंचित जास्त म्हणजे ११.९ टक्के इतकी आहे. या आकडेवारीमुळे अर्थमंत्र्यांना वित्तीय तूट भरून काढण्याच्या दृष्टीने भरपूर सूट मिळाली आहे. अर्थात, तात्पुरते का होईना, परंतु या अंदाजांनी सरकारला विरोधकांना उत्तर देण्यास पुरेसा दारुगोळा निश्चितच उपलब्ध करून दिला आहे. नोटाबंदीमुळे अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होईल, असे सांगणाऱ्या विरोधकांचा आवाज सरकारला आता तात्पुरता तरी बंद करता येणार आहे. हे अर्थशास्त्रीय आकड्यांचे निव्वळ तांत्रिक संख्याशास्त्रीय मोजमाप जर सरकारला प्रचारतंत्र म्हणून वापरता आले, तर त्याचा परिणाम खोलवर असेल. ज्याप्रमाणे मध्यवर्ती बँकेने आपली विश्वासार्हता गमावली, त्याचप्रमाणे या संख्याशास्त्रावरील लोकांचा विश्वासही त्यांचे अंदाज चुकल्यामुळे कमी होईल. याचे परिणाम गंभीर असतील. ज्यांनी हा भ्रमाचा भोपळा तयार केला आहे, त्यांना जनतेच्या अन्वर संतापला तोंड द्यावे लागेल हे निश्चित.

**(अनुवाद : प्राची हातिवलेकर)**

# जुबानी तलाक आणि स्त्रियांच्या समान हक्कांचा प्रश्न

**एस. के. सैदुलहक**

मुस्लिम स्त्रियांच्या एका संघटनेने नुकताच सुप्रीम कोर्टात एक दावा दाखल केला आहे. मुस्लिम समाजात 'तलाक' हा शब्द तीनदा उच्चारून पत्नीला तोंडी घटस्फोट देण्याची जी प्रथा अस्तित्वात आहे त्या प्रथेवर बंदी घालावी यासाठी या महिलांनी सुप्रीम कोर्टाला गा-हाणे घातले आहे. ही केस, त्याबद्दलची कायदा वैधानिक समितीची भूमिका आणि केंद्रीय सरकारचे त्याबद्दलचे मत यामुळे देशभर आज एक मोठाच विवाद उभा राहिलेला दिसतो. आज काळच असा आहे की, विविध ज्ञानक्षेत्रांमध्ये, विज्ञान-तंत्रज्ञान आणि विचारांमध्ये झालेल्या प्रगतीमुळे 'स्त्रीपुरूष समता' हे तत्व सामाजिक क्षेत्रात कायद्यान्वये सर्वमान्य झालेले आहे.त्यामुळे केवळ तीनदा तलाक हा शब्द उच्चारून आपल्या पत्नीला घटस्फोट देण्याचा जो अधिकार मुस्लिम पुरुषांना आहे, त्याबद्दल समाजात विविध ठिकाणी तीव्र प्रतिक्रिया उठल्या नाहीत तरच नवल! त्यामुळे 'जबानी तलाक' या महत्वाच्या प्रश्नावर होणाऱ्या चर्चेचे स्वागतच करायला हवे!




परंतु हे जरी खरे असले तरीही 'तोंडी तलाक' या प्रश्नाची सांगड 'समान नागरी कायदा' या मुद्याशी घातल्यामुळे हा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. वेगवेगळ्या राज्यांमध्ये चालू असणा-या किंवा लवकरच होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकांवर डोळे ठेवून अशी सांगड घालण्यामुळे मतदारांचे जे विभाजन होईल त्याचा फायदा उठवण्याचा डाव भाजप मुद्दाम खेळतो आहे. 'लॉ कमिशन'च्या मताच्या नावाखाली भाजपने आपला राजकीय कार्यक्रम कौशल्याने पुढे दामटण्याची खेळी खेळली आहे. भाजपच्या या खेळीला अर्थातच तीव्र विरोध होतो आहे. मुस्लिम धर्मांध शक्तींना 'इस्लाम खतरे मे है' ची घोषणा करण्याची उत्तम संधी मिळाली आहे आणि इस्लामच्या झेंड्याखाली सर्व मुस्लिमांनी एकत्र येण्याचे व जिहाद पुकारण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. काँग्रेसने यावर अगदी धोरणीपणाने मोघम भूमिका घेतली आहे.

पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर असलेल्या तृणमूल काँग्रेसने या विवादास्पद मुद्यावर आपली भूमिका अजून तरी स्पष्ट केलेली नाही. आणि त्या पक्षाच्या खासदारांनी केलेली विधाने इतकी परस्परविरोधी आहेत की या पक्षाला कुंपणावर बसायचे आहे आणि त्याचवेळी जनतेत धर्मांध पायावरती दुही माजवून, तिला खतपाणी घालून, त्यात हातही धुवून घ्यायचे आहेत, असा हेतू स्पष्ट दिसतो.

या उलट मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने मात्र मुस्लिम स्त्रियांचे हित लक्षात घेऊन जुबानी तलाक प्रथा बंद केली पाहिजे अशी नि:संदिग्ध भूमिका घेतली आहे. पक्षाने असेही म्हटले आहे की, जुबानी तलाक प्रथेवर बंदी आणि समान नागरी कायदा हे दोन वेगवेगळे मुद्दे असून त्यांची सांगड घालता कामा नये. खरे तर पुरोगामी मुस्लिम महिलांनी, विशेषत: 'ऑल इंडिया मुस्लिम विमेन पर्सनल लॉ बोर्डा'ने आणि मुस्लिम बुद्धिवंतांच्या एका मोठ्या गटाने जुबानी तलाक प्रथेच्या विरोधात मोठाच आवाज उठवला आहे. अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेनेही त्यांच्या भूमिकेला आणि आपला सुस्पष्ट पाठिंबा दिला आहे.

## जुबानी तलाक प्रथा आणि समान नागरी कायदा

जुबानी तलाक प्रथा आणि समान नागरी कायदा हे दोन भिन्न प्रश्न असून त्यांची सांगड घालणे हा सूज्ञपणा नव्हे. मात्र याचा अर्थ या दोन प्रश्नांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही असा होत नाही. जुबानी तलाक म्हणून पत्नीला घटस्फोट देणे ही बाब शरीयत या कायद्याखाली, मुस्लिम पर्सनल कायद्याच्या अखत्यारीत येते. जरी १९३७ पासून देशात गुन्हेगारी कायदा सर्व नागरिकांना समानपणे लावला जातो तरी देखील विवाह, घटस्फोट, पोटगी, दत्तक विधान आणि वारसा हक्क या बाबी कायदेशीररित्याच मुस्लिम व्यक्तिगत कायद्याखाली येतात. आणि ही परिस्थिती आजदेखील बदललेली नाही. शिवाय हिंदू, ख्रिश्चन वा शीख जमातीच्या लोकांनाही त्यांच्या त्यांच्या धर्मानुसार याबाबतीतले कायदे लागू करता येतात. ते त्या त्या धर्मांचे खाजगी/व्यक्तिगत कायदे मानले जातात आणि ते ते धर्म अनुसरणा-या लोकांना ते लागू होतात. परंतु या सर्वच कायद्यांना आजच्या आधुनिक काळानुसार बदलण्याची गरज आहे. मात्र समान नागरी कायद्याच्या नावाखाली फक्त मुस्लिम व्यक्तिगत कायद्यावर शरसंधान करणे योग्य नाही. असे करणे म्हणजे जातजमातवादी राजकारण खेळणे होय हे सरळ व स्पष्ट आहे.

मानवी कल्याण आणि स्त्रियांच्या अधिकाराचे संरक्षण हा आपला मुद्दा वा ध्येय असले पाहिजे हे बरोबरच आहे. पण केवळ 'समान नागरी कायदा' असे म्हटले की, हे सर्व आपसूकच होईल असे समजून कसे चालेल? केंद्रीय सरकारच्या अधिकृत विधानांमध्ये असे म्हटले आहे की, हिंदू व्यक्तिगत कायदे तर अगोदरच सुधारणा करून बदललेले आहेत.

आता यात अगदीच तथ्य नाही असे नाही. हिंदू व्यक्तिगत कायदे १९५५-५६ मध्ये वैधानिक स्वरूपात नोंदवण्यात आले आणि १९५६ मध्ये हिंदू कोड बिल पास करण्यात आले. मात्र या बिलामुळे हिंदू स्त्रियांना त्यांच्या समान हक्कांची शाश्वती मिळाली व त्यांचे संरक्षण झाले असे छातीठोकपणे म्हणता येईल काय ? या कायद्यांमुळे हिंदू स्त्रियांवर होणारे अत्याचार थांबले वा हिंदू विवाहित स्त्रियांचे खून थांबले; असे म्हणता येईल काय ? किंवा या कायद्यांमुळे दत्तक विधान, वारसा हक्क वा स्वत:चा जन्माचा जोडीदार निवडण्याचा हक्क याबाबतीत होणारा भेदभाव कायमचा संपला, असे तरी म्हणता येईल काय ?

एक बाब खरी की, स्त्रियांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी मुस्लिम व्यक्तिगत कायदा सुध्दा नीटपणे लिहिण्याची, त्याचा वैधानिक मसुदा तयार करण्याची आणि त्या कायद्यात मुळातच सुधारणा करण्याची खूप गरज आहे. अशा सुधारणा अनेक मुस्लिम-बहुल देशांमध्ये झालेल्या आहेत. त्यामुळे मुस्लिम व्यक्तिगत कायदे हे अरब देशांमध्ये ७व्या शतकात अस्तित्वात असलेल्या समाजांच्या त्या काळाच्या गरजांनुसार लागू करण्यात आले होते. त्या काळात व तेव्हाच्या परिस्थितीत यापैकी अनेक कायदे कदाचित पुरोगामीही ठरले असतील. पण हे कायदे आज खरोखरच काळानुरूप आहेत, सुयोग्य आहेत असे म्हणता येईल काय ? या व्यक्तिगत कायद्यांमध्ये आधुनिक काळानुसार बदल घडवून आणावेत या मागणीत गैर काय आहे ? कोणत्या मुस्लिम आईबापांना आपल्या मुलीला तिच्या पतीने जुबानी तलाक देऊन घराबाहेर हाकलून दिले आणि तिच्या डोक्यावरचे छत हरपले म्हणून बरे वाटेल ? किंवा मुस्लिम व्यक्तिगत कायद्यात चार बायका करण्याची तरतूद असल्यामुळे आपल्या मुलीला नव-या घरी तीन तीन सवतींबरोबर नांदावे लागते, याचा आनंद मानणारे किती मुस्लिम आईबाप समाजात खरोखर असतील ?

## जुबानी तलाक : इस्लामचा दृष्टिकोन

इस्लामनुसार विवाह हा एक सामाजिक करार आहे. जर तो करार जाचक होत असेल किंवा त्यातून आनंद मिळत नसेल तर हा करार मोडता येऊ शकतो. मात्र जरी इस्लाममध्ये हा करार मोडण्याची, तलाक देण्याची, तरतूद असली तरी 'पवित्र कुराण' या धर्मग्रंथानुसार जगन्नियंत्या अल्लाने तलाक ही गोष्ट अतिशय घृणास्पद मानली आहे. शिवाय काही भौतिक फायद्यांसाठी म्हणून त्रिवार तलाक देणे यावर इस्लाममध्ये बंदी आहे. अगदीच अपवादात्मक परिस्थितीत, म्हणजे बेबनाव फारच टोकाचा असेल तर, वा मतभेद न सोडवण्याइतके म्हणजे फारच तीव्र असतील तर जुबानी तलाक म्हणून घटस्फोट देण्याचा मार्ग अवलंबता येईल.

## पवित्र कुराण असे सांगते की :-

१. सुरा : अन्निसा, आयत ३५: "जर पतीपत्नीमध्ये फारच बेबनाव आढळला तर दोन मध्यस्थ पाठवावेत; जर त्या दोघाही मध्यस्थांना त्यांचा समेट घडवून आणता येईल असे वाटले तर अल्ला त्यासाठी सहाय्यभूत होईल."

२. सुरा : अन्निसा, आयत १२८: "जर पतीकडून तिरस्कार होतो आहे वा तो फसवणूक करतो आहे असे पत्नीला वाटत असेल तर त्या उभयतांनी आपापसात काही तडजोड करण्यात कोणतेही पाप नाही. अशा वेळेस तडजोड करणे सर्वाधिक श्रेयस्कर राहील."

३. सुरा : अल-बकाराह, आयत २२७: "आणि जर त्यांनी घटस्फोटाचा निर्णय घेतला तर अल्ला ते सर्व ऐकतो आहे आणि जाणतो आहे."

४. सुरा : अल-बकाराह, आयत २२८: "घटस्फोटित स्त्रीला तीन महिने मुदत द्यावी लागेल (ती गरोदर आहे की नाही हे पहाण्यासाठी). या तीन महिन्यांच्या काळात जर तिला दिलजमाई करून हवी असेल तर तिला या काळात परत स्वीकारण्याचा अधिकार पतीला आहे; तसेच पत्नीला देखील तो अधिकार आहे, तिच्याकडून काय अपेक्षा आहेत वा काय संयुक्तिक आहे यानुसार ते ठरेल."

## जुबानी तलाक प्रथेचे लावण्यात आलेले अर्थ :

इस्लामपूर्व अरब देशांमध्ये तलाक प्रथा अस्तित्वात होतीच. इस्लामने फक्त काही अटी घातल्या व तिला वैधानिक स्वरूप दिले. परंतु शरीयतनुसार व्यभिचार करण्यासाठी किंवा रागाच्या भरात किंवा मद्यधुंद अवस्थेत 'तलाक, तलाक, तलाक' असे तीनदा म्हटले म्हणून घटस्फोट सिद्ध होत नाही. तलाक हा शब्द तीन वेगवेगळ्या वेळी उच्चारायचा आहे. सैद अमीर अली त्यांच्या 'स्पिरिट ऑफ इस्लाम' या ग्रंथात असे म्हणतात की 'इस्लाम तलाक हा शब्द तीन वेगवेगळ्या काळात उच्चारण्याची शिफारस करतो ज्यामुळे घटस्फोट होण्याअगोदर त्या जोडप्याला आपले संबंध सुधारण्यासाठी काही वेळ मिळू शकेल. जर सारेच प्रयत्न फोल ठरले तर मग तिसरा व शेवटचा तलाक हा शब्द उच्चारण्याची मुभा आहे.'

आता या ठिकाणी असा महत्वाचा मुद्दा उपस्थित होतो की, एकाच वेळेला तीनदा,'तलाक, तलाक, तलाक' असे म्हटले की, घटस्फोट झाला असे समजण्याची प्रथा किंवा रिवाज हा इस्लाम संमत आहे काय ? जरी 'पवित्र कुराण' या ग्रंथाने त्याला मान्यता दिली नसली किंवा प्रेषित मुहंमद पैगंबरांच्या काळात जरी ही प्रथा प्रचलित नसली तरी दुसरे खलिफ हजरत उमर यांच्या काळात ही 'तलाक-बिदाह' प्रथा अस्तित्वात आली. त्या काळातील झालेल्या काही वैवाहिक बेबनावाच्या केसेसमध्ये, केवळ अपवादात्मक परिस्थितीतील एक उपाय म्हणूनच असा तलाक दिला गेला होता. आणि हे केवळ तात्कालिकच आहे, असेही स्पष्ट करण्यात आले होते. असा 'तलाक' हा 'अपवाद' म्हणूनच गणला गेला होता. त्यावेळी बऱ्याच केसेस मध्ये तलाक ह्या शब्दाचा उच्चार मध्ये पुरेसा काळ ठेवून तीन वेगवेग ?या वेळी केला नव्हता आणि पती पत्नीत समन्वय घडवून आणायची संधी दिली गेली नव्हती; हे खरे पण त्याचे कारण त्यातील पत्नीला फार अन्यायी वर्तणूक दिली जात होती व व्यभिचार होत होता हे होते. विवाहातील ह्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्या वेळी एका दमात तलाक हा शब्द तीनदा म्हणून पत्नीला घटस्फोट देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला होता. पण त्या अपवादात्मक प्रसंगांमध्ये स्वीकारण्यात आलेला हा अपवादात्मक मार्ग म्हणजेच मुस्लिम सर्वसाधारण कायदा समजणे हे इस्लामला धरून नाही. हजरत उमर यांच्या निधनानंतर सुमारे ५०० वर्षांनी इब्न रशीद (११२६-११९८) या इस्लामच्या थोर, उदारमनस्क व विद्वान अभ्यासकाने असे म्हटले होते की 'तलाक-बिदाह' ही प्रथा एक तात्पुरती तरतूद होती आणि ती इस्लामनुसार अजिबात वैधानिक समजता येणार नाही. रशीद यांच्या मृत्यूनंतर जवळपास पन्नास वर्षांनी जन्माला आलेल्या इब्न तायमैय्याह या इस्लामच्या आणखी एका विद्वान अभ्यासकाने देखील 'ही प्रथा इस्लामी कायद्यानुसार वैधानिक नाही' असे म्हटले होते; आणि

इस्लामचा त्यांनी लावलेला हा अर्थ इजिप्त व सीरिया या इस्लामी देशांमध्ये देखील मान्य करण्यात आला आहे.

## विवेकनिष्ठ भूमिका कोणती ?

इस्लामी मूलतत्ववाद्यांच्यानुसार जुबानी तलाक प्रथेमुळे मुसलमानांच्यामध्ये पत्नीला त्रास देण्याचे प्रमाण कमी आहे. त्यांच्या मते जुबानी तलाक प्रथा संपवणे म्हणजे मुस्लिम व्यक्तिगत कायद्याच्या तरतुदी पातळ करणे असून हा मुस्लिमांना बाजूला फेकण्याचा, त्यांच्या सीमांतीकरणाचा डाव आहे. अगोदरच भाजपच्या प्रक्षोभक धर्मांध राजकारणाने तयार केलेल्या कमालीच्या तणावाच्या परिस्थितीमुळे आपल्या देशातील मुस्लिम जनता भयग्रस्त झाली आहे व त्यांना खूप असुरक्षित वाटते आहे. दुर्दैवाने या गढूळ वातावरणाचा फायदा उठवण्यासाठी मुस्लिम धर्मांधशक्ती जनतेत आणखी फूट पाडत आहेत. कोणत्याही स्वरूपातील धर्मांध विचारव्यवहारांचा आपण प्रतिकार करायलाच हवा. पण विशेषत: 'जुबानी तलाक'सारख्या लोकशाहीतत्वांची पायमल्ली करणा-या जुन्या पुराण्या रूढीला आपण कोणत्याही परिस्थितीत विरोध केलाच पाहिजे. घटस्फोटाला, म्हणजे विवाह विच्छेदनाला, आपला विरोध नाही. जर पती-पत्नीमध्ये तीव्र मतभेद असतील व त्यांची नाती अत्यंत ताणलेली असतील तर परस्परसंमतीने वेगळे होण्यासाठी त्यांनी घटस्फोटाचा मार्ग खुशाल स्वीकारावा. त्याला कोणाचीच हरकत असायचे कारण नाही. पण केवळ एका दमात तलाक असे तीनदा म्हणून पत्नीला घटस्फोट देण्याचा संपूर्ण एकतर्फी अधिकार पतीला का म्हणून असावा ?

इथे आणखी एक विरोधी मतही विचारात घेतले पाहिजे. ते असे की, इस्लाममध्ये तलाक देण्याचा अधिकार पत्नीलाही दिलेला आहे. पण हा अधिकार काही शर्तींवर दिलेला आहे. तो 'काबिलनामा' मध्ये, म्हणजे विवाहाच्या कागदपत्रांमध्ये नमूद केलेल्या शर्तींमध्ये, लिहिलेला, नमूद केलेला असला पाहिजे. आता आपल्या पितृसत्ताक व्यवस्थेत अटी घालायचा वा सौदेबाजी करायचा अधिकार हा नव-यामुलाला नव-यामुलीपेक्षा कितीतरी पटींनी जास्त असतो. अशा परिस्थितीत कोणते आई-बाप हे तलाक मागण्याच्या अधिकाराचे कलम मुलीच्या बाजूने काबिलनाम्यात घालू शकतील ? किंवा ते घालण्याबाबत आग्रह धरू शकतील ?

मुस्लिम विवाहात नव-यामुलीची संमती आवश्यक असते. मग ती संमती विवाह विच्छेदात आवश्यक का बरे नसावी ? इस्लामनुसार तलाक दिलेल्या बायकोला पोटगी देण्याची जबाबदारी नव-यावर तीन महिन्यांच्या काळापर्यंतच असते. त्याला वाट पहाण्याचा काळ वा 'इद्दत'चा कालावधी असे म्हटले जाते. इद्दतचा काळ संपला की, पत्नीला कोणत्याही प्रकारे पोटगी द्यायला पती बांधील नाही. जर ही स्त्री बेकार असेल, तिला रोजगार वा नोकरी नसेल, तर तिने आपला स्वत:चा प्रतिपाळ करण्यासाठी पैसा कोठून आणावा बरे ? शहाबानोला तिच्या नवऱ्याने २०-३० वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर तलाक दिला होता; तसा तलाक मिळाल्यानंतर त्या स्त्रीने काय करावे ? तिने हे छळ व त्रास का सोसावा ? ज्याप्रकारचे संरक्षण हिंदू स्त्रियांना मिळते ते संरक्षण मुस्लिम स्त्रीला का असू नये ? तिला तशा संरक्षणापासून वंचित का म्हणून रहावे लागते ?

जगातल्या इतर काही मुस्लिम देशांमध्ये व्यक्तिगत कायद्यात बदलत्या कालानुरूप बदल केलेले दिसतात. इजिप्त, तुर्कस्तान आणि ट्युनिशिया या देशांमध्ये कोर्टाबाहेर दिला जाणारा तलाक वैधानिक मानला जात नाही. फार कशाला आपल्या शेजारच्या पाकिस्तानात १९६१ सालीच शरीयत कायद्यात बदल करण्यात आला होता. आज हा सुधारित कायदा पाकिस्तान व बांगला देशातही लागू आहे. इराण व इराक या देशांमध्येही अशा प्रकारचे बदल करण्यात आले आहेत. मग भारतातच ह्या सुधारणा होऊ नयेत अशी आडमुठी भूमिका काय म्हणून घेतली जाते ?

या संदर्भात आपण एक महत्वाची गोष्ट लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे गुन्हेगारी संदर्भातले शरीयतमधले कायदे भारतातल्या मुस्लिमांसाठी लागू होत नाहीत, ते स्वीकारले गेलेले नाहीत. त्याबाबतीत भारतातील गुन्हेगारी कायदा मुस्लिमांसहित सर्व जाती जमातींना समान रीतीनेच लागू होतो. त्याचप्रमाणे इतरही अन्य कायदे, जसे की, साक्षीदाराचा कायदा, करार मदारांबद्दलचा कायदा, हस्तांतरणाचा कायदा, पालकत्वाचा कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा हे सर्व कायदे सर्वांसाठी एकसारखे व समानच आहेत. मग फक्त त्रिवार तलाक कायदा रद्दबातल करण्याच्या बाबतीतच एवढा गदारोळ का उठवला जातोय ?

हे खरेच आहे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजप यांनी ज्या पध्दतीने त्रिवार तलाकचा मुद्दा पुढे रेटला आहे त्यामुळे समाजात तणाव निर्माण होऊन समाजातली शांतता आणि विविध समूहांचे एकमेळी सहअस्तित्व यांना धोका पोहोचण्याची दाट शक्यता आहे. ज्या रा.स्व. संघाचे कार्यकर्ते समान नागरी कायद्याची एवढी टिमकी वाजवताहेत आणि मुस्लिम स्त्रियांच्या हक्कांबद्दल कनवाळा फुटून डोळ्यांमधून घळाघळा नक्राश्रू ढाळताहेत, त्यांचा स्त्री-पुरुष समानतेच्या तत्वावर खरोखरच किती विश्वास आहे ? रा.स्व. संघाचा स्त्रियांकडे पहाण्याचा खरा दृष्टिकोन काय आहे ? याचे प्रत्यंतर आपल्याला गोळवलकर गुरुजींच्या लिखाणात येते. त्यांची मजल याबाबतीत एवढी पुढे गेली होती की, त्यांनी मुस्लिम लोकसंख्या काबूत ठेवण्याचा मार्ग म्हणून मुस्लिम स्त्रियांना ठार मारून टाकण्याचा मार्गही सुचविला होता ! मुस्लिम स्त्रियांबद्दलचा यांचा खरा 'कनवाळा' हा असा आहे !

इथे आणखीही एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ती अशी की, नागरी कायदा सर्व हिंदूंसाठी सारखा नाही. उदाहरणार्थ, केरळातल्या 'नायर' लोकांसाठी त्यात काही खास तरतुदी आहेत. तसाच तामिळनाडूतील वारसा हक्कांचा कायदाही वेगळा आहे. बऱ्याच हिंदू जमाती व आदिवासी समूह त्यांच्या समूहांमधल्या प्रथांनुसार ज्या रूढी व परंपरा व कायदे आचरतात, त्या हिंदू व्यक्तिगत कायद्यांपेक्षा खूप वेगळ्या आहेत आणि उत्तर पूर्व भारतातील लोकांच्या बाबतीत खास तरतुदी केलेल्या नाहीत काय ? शिवाय, हिंदू व्यक्तिगत कायद्यानुसार एकत्र कुटुंबाला कर भरण्यात सवलती मिळत नाहीत काय ? ते फायदे इतर समाजांमधल्या लोकांना मिळत नाहीत. हे तर झालेच पण त्याव्यतिरिक्त एक महत्वाचा मुद्दा असा की केवळ कायदा केला की, समानता प्रस्थापित होते काय ? हुंडाबंदीचा कायदा आणि आणि बालविवाह प्रतिबंधाचा कायदाही आहेच. दोन्ही कायदे चांगले कडक आहेत पण तरीही ह्या अभद्र प्रथांचे समाजातून समूळ उच्चाटन झालेले आहे काय ?

## विद्रोहाचे आवाज

'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड'ने जुबानी तलाक प्रथा अबाधित ठेवण्याचा नारा दिला आहे. तशा अर्थाचे निवेदन (ॲफिडेव्हिट) त्यांनी सुप्रीम कोर्टाला सादरही केले आहे. हेच बोर्ड शाहबानो तलाक प्रकरणाच्या वेळेला

***(पान १४ पहा)***

# रोहित वेमुला प्रथम स्मृतीदिन : ऐक्याचे दर्शन

**कुणाल शंकर**

*(रोहित वेमुलाच्या आत्महत्येला एक वर्ष झाले. त्या निमित्ताने धर्मांध हिंसाचाराची झळ सोसलेले देशभरातील लोक हैद्राबाद विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर त्याला अभिवादन करण्यासाठी एकत्र आले होते.)*

रोहित वेमुला या दलित संशोधकाच्या आत्महत्येच्या बरोबर एक वर्षानंतर १७ जानेवारीला संध्याकाळी पाच वाजता हैद्राबाद विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर भारतभरातील विविध गटांचे कार्यकर्ते जमले होते. हे भारतभरातील भिन्न भिन्न गट देशभरात विविध पध्दतीने द्वेषातून होत असलेली गुन्हेगारी कृत्ये थांबवण्याचा एकमेव कार्यक्रम घेऊन एकत्र आले होते. .

इथे आपल्यात हजर असलेल्या रोहितच्या आईने भले आपला मुलगा गमावला असेल पण आज तिला आपल्या सर्वांच्या रुपाने लाखो मुले लाभली आहेत, आपण सर्वांनी ही चळवळ अशीच पुढे चालविली पाहीजे असे म्हणत ही एकीची भावना मृत गायींचे कातडे काढण्याचे काम करणाऱ्या तरूणांना गेल्या वर्षीच्या जुलैमध्ये गुजरातच्या उना येथे मारहाण झालेल्या कुटुंबातील पियुष सारवाया याने नेमकी व्यक्त केली.



जवळजवळ ५०० लोक या प्रवेशद्वारावर जमा झाले होते. विद्यापीठाच्या प्रशासनाने बाहेरच्यांना विद्यापीठाच्या आवारात प्रवेशाची परवानगी नाकारली होती

२०१५ मध्ये दादरी हत्याकांडातील बळी मोहम्मद अखलाखचा सर्वात लहान भाऊ जन मोहम्मद सैफी आपल्या वकीलासह आला होता. त्याचे अतिशय प्रभावशाली भाषण झाले. त्याच्या मुलाची तब्येत बरी नव्हती पण 'मला आंबेडकर स्टुडंट युनियनचा कार्यकर्ता, दोन्था प्रशांतचा पाठिंबा देण्यासाठी येण्याबद्दल फोन आल्याबरोबर मी दिल्लीहून निघण्याचा निर्णय घेतला' असे त्याने आपल्या भाषणात सांगितले. दोन्था प्रशांत रोहित वेमुलाच्या त्या पाच साथिदारांपैकी एक आहे, ज्यांच्याविरोधात हैद्राबाद विद्यापीठाने विद्यापीठाच्या आवारातील राजकारणासंदर्भातील काही किरकोळ कारणांवरून कडक कारवाई केली होती.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील(जेएनयू) विद्यार्थी नजीब अहमद गेल्या १५ ऑक्टोबरपासून बेपत्ता आहे. त्याचे अझीम आणि हसीन खान हे चुलतभाऊ दिल्लीहून आले होते. अझीम खान आपल्या भाषणात म्हणाला, 'नजीब, रोहित, अखलाख यांना न्याय मिळो अथवा न मिळो' पण अशा घटना पुन्हा घडणार नाहीत याबद्दल आपण अतिशय दक्ष राहीले पाहिजे. नजीबच्या आई फातिमा नफीस प्रकृती ठीक नसल्याने प्रवास करू शकल्या नाहीत पण त्यांनी अभिवादनाचा संदेश पाठवला.

जेएनयूच्या राजकारणात नुकताच प्रवेश केलेल्या 'बिरसा-आंबेडकर-फुले स्टुडंट्स असोशिएशन' किंवा 'बाप्सा'चा एक संघटक असलेला राहुल सोनपिंपळे आपल्या भाषणात म्हणाला, 'ज्यांच्यावर हल्ले झाले आहेत ते दलित आणि मुस्लीम समाजातील आहेत आणि या दोन्ही समाजात एक जैविक सांधा आहे. आज हे निषेध फक्त विद्यापीठांपुरतेच मर्यादित आहेत, पण आम्हाला आशा आहे त्याची व्याप्ती वाढेल.'

मुख्य प्रवेशद्वारावर मोठ्या संख्येने पोलीस तैनात करण्यात आले होते. ५ वाजून ४५ मिनिटांनी रोहितची आई राधिका वेमुला आणि भाऊ राजा वेमुला आले, तेव्हा दोन मोठ्या पोलीस गाड्या अटक करण्याच्या उद्देशाने आणण्यात आल्या. राधिका वेमुला यांनी आपल्या भाषणात नुकतीच राजा वेमुलाच्या जातीसंदर्भात जी तपासणी केली गेली, त्या वेळेस तपासयंत्रणांनी कुटुंबाला ज्या पध्दतीने प्रश्न विचारले याची जी धक्कादायक माहिती सांगितली त्यावरून त्यांच्यासाठी गेल्या वर्षभरात काहीच बदल झालेला नाही.

संध्याकाळ सरून अंधार पसरू लागला होता. जमलेल्या लोकांच्या मनात एकच प्रश्न घोंघावत होता, वेमुला कुटुंबियांना आणि रोहित वेमुलाचा जवळचा मित्र रियाझ याला रोहित वेमुलाने निदर्शने करत आपले शेवटचे दिवस ज्या शॉपिंग सेंटरच्या आवारात काढले, तेथे अभिवादन करू देण्यासाठी जाऊ देणार की नाही ? हे शॉपिंग सेंटर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच होते, जेथे विद्यार्थ्यांनी रोहित वेमुलाचा पुतळा उभा केलेला आहे. पण विद्यापीठाचे अंतर्गत सुरक्षावाले आणि पोलीस यांच्याबरोबर बराच वादविवाद झाला. त्यानंतर बरोबर आठ वाजता विद्याशाखांच्या काही सभासदांनी तोडगा काढला की, संरक्षणाचा उपाय म्हणून कार्यकर्त्यांची मानवी साखळी करून राधिका वेमुला आणि राजा वेमुलाला न्यावे. पण अंतर्गत सुरक्षा पोलिसांनी तो नाकारला. अखेर वेमुला कुटुंबिय आणि काही कार्यकर्ते यांच्यासह 'हिंदुस्थान टाइम्स'चा वार्ताहर सुदिप्तो मोंडाल यालाही पोलिसांनी अटक केली व मध्यरात्रीनंतर त्या सर्वांना सोडून देण्यात आले.

जवळजवळ साडेआठच्या सुमारास संशोधक विद्यार्थी अरुण गोकुलमंडा आणि वर्तमानपत्राचा एक वार्ताहर(ज्याला आपले नाव गुप्त राखावयाचे आहे) यांनी सांगितले रोहितचे वडील मणिकुमार यांना रोहितच्या पुतळ्यासमोर फुले वाहात असताना आपण पाहिले. याचा पुरावा म्हणून आपल्याकडे ते त्या शॉपिंग सेंटरच्या पायऱ्यांवर बसून इतरांशी बोलतांनाचे सात फोटो आहेत

*(पान १४ पहा)*

# ‘नोटाबंदी’ प्रगतीची संधी की अधोगतीची आपत्ती

***समाजवादी, प्रबोधिनी व परिवर्तनवादी संघटनांच्या वतीने सांगली जिल्ह्यातील रामानंदनगर (किलोस्कर वाडी) येथे खुले विचारमंथन उपक्रमांर्गत माकपचे राज्य कमिटी सदस्य अजित अभ्यंकर यांच्यावरील विषयावर झालेल्या व्याख्यानाचा गोषवारा***

‘बंधू-भगिनींनो’ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी घोषित केलेल्या ‘नोटा बंदी’च्या निर्णयाचे जे दुष्परिणाम झाले. त्याचा तुम्हाला जो त्रास सोसावा लागला. छळ, कुचंबना जी भोगीत आला आहात त्या संबंधी मी काही बोलणार नाही. काळा पैसा बाहेर काढण्याच्या नावाखाली सरकारने हा जो निर्णय घेतला त्या संबंधीची माझी भूमिका आज मी तुमच्या पुढे मांडणार आहे. त्या आधारे तुम्ही आपली भूमिका ठरवावी अशी माझी अपेक्षा आहे.

आपल्या देशाचे आजचे वास्तव विचारात घेतले तर, देशातील शिक्षणासाठी राज्यकर्त्यांनी राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% रक्कम खर्च करणे आवश्यक असताना सरकार मात्र ३% पर्यंतसुद्धा खर्च करू शकले नाही. आरोग्यावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३% खर्च करण्याची अनेक वर्षाची मागणी असताना १% पेक्षाही कमी रक्कम आरोग्यावर खर्च होत असल्याचे दिसून येत आहे. या देशाचे राज्यकर्ते अनेक वर्षे मागणी करूनही शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमी भाव देवू शकले नाहीत. देशात बेरोजगारी आणि बेरोजगारीतून गुन्हेगारी वाढत असताना राज्यकर्ते बेरोजगारीचा प्रश्न सोडवू शकले नाहीत. किमान या बेरोजगारांना नोकरी-धंदा उपलब्ध होईपर्यंत बेकार भत्ताही हे राज्यकर्ते देऊ शकत नाही. मग ते राज्यकर्ते कॉंग्रेसचे असोत अगर भाजप आघाडीचे असोत. या सर्व समस्यांच्या निराकरणात राज्यकर्ते कमी पडले आहेत.

या सर्व समस्यांच्या सोडवणुकीसाठी किमान राष्ट्रीय उत्पन्नाच्या दुप्पट खर्चाची तजवीज करावी लागेल. आपले राज्यकर्ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त १७% कर गोळा करतात. अमेरिकादी पाश्चात्य देशात कर वसुलीचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४०% आहे. आपल्या देशापुढील समस्यांच्या निराकरणासाठी कर वसुलीचे प्रमाण ३०% पर्यंत न्यावे लागेल.

कराचे उत्पन्न मागणी आणि सरकारचा खर्च यांचा ताळेबंद जमला तर आपल्या देशापुढील समस्यांच्या निराकरणाला काहीशी मदत होईल. पण सरकार यासंबंधी ठोस धोरण अंगिकारत नाही.

आज आपल्या देशात आवश्यकतेपेक्षा कितीतरी कमी अधिकारी आणि कर्मचारी असल्याचे प्रत्ययाला येते. पोलीस खात्याचा विचार केला तर एक लाख लोकसंख्येमागे ३३० पोलीस असावेत असे गृहीत मानले जाते, या निकषानुसार भारतात एक लाख लोकसंख्येमागे १३६ पर्यंत पोलीस आहेत. अमेरिकादि, युरोपमध्ये एक लाख लोकसंख्येमागे ७५०० सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या आहे. तर भारतात मात्र एक लाख लोकसंख्येमागे १६६२ कर्मचारी संख्या आहे. पाहिजे आहेत पाच पट. १० लाख लोकसंख्येमागे अमेरिका व विकसित देशात ६० न्यायाधिश आहेत. तर आपल्या भारत देशात फक्त १४ न्यायाधिश आहेत. गरजेच्या प्रमाणात न्यायाधिशांची संख्या नसल्याने ३ कोटी खटले पडून आहेत. त्यामुळे सरकारी यंत्रणा चालढकल करतात.

सरकारी यंत्रणा वाढविण्याऐवजी कमी करण्यावर सरकारने भर दिल्याचे दिसत आहे. पुरेसे आर.टी.ओ. नाहीत. आर.टी.ओ. इन्स्पेक्टरच्या जागा रिक्त आहेत. इन्कमटॅक्स वसुलीसाठी केंद्र सरकारकडे पुरेसे अधिकारी नाहीत. करवसुली अधिकाऱ्यांच्या ३० जागा रिक्त आहेत. सुशासन निर्माण करणाऱ्या साऱ्या यंत्रणाच सरकारने मोडीत काढल्या आहेत. खरं तर सरकारने सुशासन निर्माण करण्यासाठी पंचवीस वर्षाच्या धोरणाची मांडणी करणे आवश्यक होते. ते आज अस्तित्वात नाही.

सरकारकडे उत्पन्न कुठून येते? तर प्रामुख्याने दोन प्रकारच्या करातून येते. एक प्रत्यक्ष कर (आयकर) आणि दुसरा अप्रत्यक्ष कर असतो. आपण पेट्रोल खरेदी करतो, त्यावेळी तो पंपवाला व्यापारी विक्रीकर भरतो, म्हणजे आपल्या खिशातून वसूल केलेला विक्रीकर सरकारकडे भरतो. गेल्या तीन वर्षात क्रुड तेलाच्या किमती जागतिक पातळीवर कमी झाल्या. एका महिन्यात तर त्यापूर्वीपेक्षा १/३ ने कमी झाल्या. त्या वेळी सरकारने कर वाढविला. त्यामुळे भारतात तेलाच्या किमतीत फारशी घट झाली नाही. या काळात सामान्य माणसांच्या खिशातून २/३ अप्रत्यक्ष कराची वसुली केली. त्यामुळे करातून राष्ट्रीय उत्पन्न वाढण्याऐवजी कर बुडवेगिरीत वाढ झाली. या काळात राष्ट्रीय उत्पन्नातील ४०/- रुपये कमी झाले. सुशासनासाठी ही कर बुडविलेली कराची रक्कम वसुली झाली पाहिजे.

विद्यार्थी संघटना शिक्षणासंबंधीच्या अनेक मागण्या घेऊन पुढे आलेल्या आहेत. शेतकऱ्यांना न्याय देणे आवश्यक आहे. बेरोजगारांना नोकरीधंद्याची गरज आहे. या प्रत्येक समस्येचे कारण करबुडवेगिरीत आहे. ही रक्कम जोपर्यंत वसूल होत नाही. तोपर्यंत वरील मागण्यांसाठी पैसा उपलब्ध होत नाही. काळा पैसा प्रामुख्याने कर बुडवेगिरीतून वाढत असून, कर बुडवेगिरी ही आज आपल्या देशापुढील मोठी समस्या आहे.

कायदा, घटना आपल्या बाजूला आहेत. तरीसुद्धा आपण कर बुडविणाऱ्यांकडून कर वसूल करू शकत नाही. आपण आपले शत्रू आहोत. सरकार कृती करीत नाही. कर वसुली हे काम सरकारचे आहे. घोड्याने गाडीला ओढले पाहिजे. गाडीने घोड्याला ओढणे ही अपेक्षा निरर्थक आहे. सरकार म्हणते सारा काळा पैसा नोटांत आहे. खरे तर नोटांत काळा पैसा नसतो. काळ्या पैशाचा उगम बुडवलेल्या करात असतो. सरकार नोटांत किती काळा पैसा आहे? हे जाहीर करीत नाही.

करपात्र असूनही बुडवलेले उत्पन्न म्हणजे काळा पैसा असतो. हे काळे धन जोपर्यंत सापडत नाही. तोपर्यंत ते वाढत राहते. ते शोधावे लागते. सापडले तरी त्याला ‘क्लिनचिट’ दिली जाते. नोटातील काळा पैसा हा काळ्या पैशाच्या पाऊल खुणा आहेत. जेवढा वाढलाय तेवढा तो नोटांत नाही. कॅशलेस व्यवहार हा सुद्धा काळ्या पैशाच्या पाऊलखुणा आहेत. एकमेव काळा पैसा पांढऱ्या प्रमाणात चलनात आहे. तो शोधावा लागेल.

सरकार सांगते पाचशे, हजाराच्या नोटांमध्ये काळा पैसा आहे. नोटा बदलण्यासाठी रांगा लागतात. मात्र इन्कमटॅक्स भरण्यासाठी लागत नाहीत. हे वास्तव आहे. इन्कमटॅक्स भरण्यासाठी रांगा लागत नाहीत. तोपर्यंत काळा पैसा बाहेर येत नाही. म्हणून आमचे मत असे आहे की, काळा पैसा शोधण्याचा ‘रोडमॅप’ सरकारने तयार केला पाहिजे.’

बँकांत पैसे भरताना, काढताना सत्य शोधण्यासाठी कोणतीही चेकींगची तपासणीची व्यवस्था नाही. नोटाबंदीच्या निर्णयापूर्वी सराफा बाजाराच्या स्टॉक चेकिंगची व्यवस्था सरकारने करणे गरजेचे होते. सरकारने तशी कारवाई केली नाही. त्यामुळे इन्कमटॅक्स चुकवलेला पैसा सरकारच्या दुकानात सोने-चांदी खरेदीत, नोटाबंदीचा निर्णय जाहीर होताच गेला. त्यामुळे सोन्याचा दर साठ हजारावर

***(पान १२ पहा)***

# जात, साहित्य आणि राम गणेश

**सुभाष थोरात**

डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी एका मुलाखतीमध्ये 'दलित साहित्यिक कांदबरी लेखन करू शकणार नाहीत, कारण त्यांना संपूर्ण समाजाचे चित्रण करता येणार नाही' असे म्हटले होते. त्यांच्या उथळ शेरेबाजीला आता बराच काळ लोटला आहे. त्यानंतरच्या काळात अनेक दलित साहित्यिकांनी कादंबरी लेखन केलेले आहे. एकेकाळी भालचंद्र नेमाडे सर्वज्ञ साहित्यिक असल्याचा भ्रम मोठ्या प्रमाणात पसरला होता. त्यांच्या भक्तांचा एक गोतावळाही तयार झाला होता. आजही तो आहे त्यातील काहींच्या पदरात साहित्य अकादमीचे पुरस्कारही जमा झाले आहेत.

आज नेमाडे आणि त्यांचा देशीवाद यावर सडकून टिका होत आहे. त्यामुळे त्यांचे या क्षेत्रात पूर्वी असणारे मान्यताप्रत अढळपद ढळले आहे. जातीव्यवस्थेबद्दलच्या त्यांच्या निर्बुद्ध विधानांमुळे त्यांची साहित्यिक महत्ताही पूर्ण घसरली आहे. सुप्रसिद्ध विचारवंत रावसाहेब कसबे यांनी त्यांच्या देशीवादाच्या प्रतिगामी चिंध्या त्यांच्या अंगावर भिरकावल्या आहेत तसेच सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी नेमाडेंचा देशीवाद आरएसएसचे वैचारिक गुरु, गोळवलकर गुरुजी यांच्या प्रतिगामी विचारांशी कसा मिळता जुळता आहे. हे ठोसपणे सिद्ध केले आहे.

अशा नेमाडे यांनी 'दलित साहित्यिकांबद्दल जी शेरेबाजी केली आहे, की ते संपूर्ण समाजाचे चित्रण करू शकणार नाहीत'. तर मग संपूर्ण समाजाचे चित्रण मराठीत साहित्यात किती कोणी केले आहे ? महाकवी असलेले देहुचे तुकारामबुवा सोडले तर दलित, बहुजनांच्या, स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडणारे मराठीत किती साहित्यिक आहेत. आधुनिक मराठी साहित्यात केशवसुत, कुसुमाग्रज, वि. स. खांडेकर, साने गुरुजी, शरदचंद्र मुक्तीबोध, विं. दा. करंदीकर सोडले तर व्यापक मानवतावादी दृष्टी असलेले साहित्यिक सापडतात काय ? ते परिपूर्ण आहेत असे नाही, परंतु त्यांच्या मर्यादा मान्य करूनही त्यांनी काही एक मानवतावादी भूमिका पुढे आणली आहे.

अगदी अलिकडे अवतरलेल्या स्त्री वादाचा जागर करणाऱ्या स्त्रीवादी साहित्यिकांना दलित, मुस्लीम, आदिवासी, भटक्याविमुक्त आणि शेती व्यवस्थेत पिचून जाणाऱ्या शेतकरी स्त्रीच्या दु:खाचा कानोसा घेता आला आहे काय ? एकंदर स्त्री मुक्तीत त्यांची स्त्री मुक्ती सामावलेली आहे काय ? केवळ पुरुष सत्तेतून त्यांच्या वर्गीय-जातीय शोषणाचे भान कळणार आहे काय ? याचा अर्थ असा होतो की, संपूर्ण समाजाच्या सुख-दु:खाची नोंद जाणीवपूर्वक जातीपल्ल्याड जाऊन घेतली आहे. असे साहित्य, साहित्यिक अभिजनवादी ब्राह्मणी साहित्यात दुर्मिळ आहेत.

नेमाड्यांसारख्या बहुजन जातीतून पण जमीनदारी शेतकरी मानसिकता असणाऱ्या साहित्यिकांनी जे साहित्य प्रसवलेले आहे, त्यात कारू-नारूंचे शोषण करून मस्तवाल झालेल्या आणि आता नव्या अर्थकारणात आर्थिक विवंचनेत असलेल्या जमीनदारी शेतकरी जातींचे दु:खच केंद्रस्थानी आहे. नेमाडे यांची 'हिंदु' याचे मूर्तीमंत उदाहरण आहे. त्यामुळे जातींनी विखंडीत केलेल्या समाजात कोणीही जातीपल्याड जाऊन व्यापक मानवतावादी भूमिका घेऊन, समाजाला जातीअंताची शिकवण देणारे, तसे सुचवणारे, सर्वात तळाच्या घटकाचे शोषण, दु:ख, भाव-भावना पुढे आणणारे साहित्य उच्च समजल्या जाणाऱ्या जातीतून आलेल्या साहित्यिकांनी केलेले आढळत नाही. आपल्याच जात-वर्गाच्या सुखदु:खापलिकडे ते जात नाहीत. नाहीतर दलित साहित्याचा, ग्रामीण साहित्याचा, आदिवासी साहित्याचा, भटक्या विमुक्त्यांच्या साहित्याचा जन्मच झाला नसता. आपले मराठी साहित्य आज गावात आत असणाऱ्यांचे साहित्य आणि गावकुसाबाहेर असणाऱ्यांचे साहित्य यांत विभागले गेले आहे. जात हीच या साहित्याची मर्यादा ठरते आणि सामर्थ्यही ठरते.

बहुजन जातीतून लेखक पुढे आले ते बहुजन जातीतून वाचक वर्ग निर्माण झाल्यानंतर. मराठी साहित्य संमेलनात तसेच विश्व साहित्य संमेलनात आजही पु. ल. देशपांडे यांच्या पुस्तकांना मागणी असते, ते मोठे साहित्यिक आहेत असे नाही. पण त्यांच्या वाचक वर्गाची पार्श्वभूमी पाहिल्यावर ते लक्षात येथे. बाबुराव बागुलांचे साहित्य अमुक एक जातीची पार्श्वभूमी असलेला वाचकवर्गच घेतो, अर्थात या सगळ्याला अपवाद आहेत. आपण सरासरीने बोलत आहोत. तसे नसते तर समाजपरिवर्तन केवळ अवघड झाले असते. आपण एक सार्वत्रिक वस्तुस्थितीबद्दलल बोलत आहोत. 'जातींचा समाजात असणारा प्रभाव' या संदर्भात आपण बोलत आहोत. त्यामुळे साहित्यिकांचे हे 'जातीकरण' बऱ्याच वेळा त्यांची महत्ता ठरते.

प्रस्थापित जात-वर्गाकडून प्रसवल्या जाणाऱ्या साहित्यातून जी मूल्ये पुढे येतात, ती जणू समाजाचीच मूल्य आहेत असे प्रस्थापीत केले जाणे. उदा. प्रमाण भाषा. या प्रमाण भाषेने सुरुवातीच्या काळात अनेक बहुजनांतून येणाऱ्या साहित्यिकांची कत्तल केली आहे. भालचंद्र नेमाडे यांची सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे, त्यांच्या 'टीका स्वयंवर' या पुस्तकातून या प्रमाण भाषेची, या भाषेतील साहित्याची, साहित्यिकांची, त्यांच्या समीक्षा पद्धतीची यथेच्छ टिंगलटवाळी करून त्यांची प्रस्थापित महत्ता नाहीसी केली. त्यामुळे बहुजन जातीतून येणाऱ्या आणि आपल्या बोली भाषेतून व्यक्त होणाऱ्या अनेक साहित्यिकांना या प्रमाण भाषेचे दडपण झुगारून देणे शक्य झाले.

या सगळ्या वैचारिक घुसळणीतून खरे तर जाती, पाती, धर्म या पलिकडे जाणारे माणूस हे केंद्र मानून त्याच्या सुखदु:खाची कैफीयत मांडणारे वैश्वीक दृष्टीचे साहित्य मराठी भाषेत निर्माण होण्याची गरज आहे. केवळ ज्ञानेश्वर आणि तुकारामांची उदाहरणे देऊन मराठी भाषेची थोरवी सिद्ध करीत राहण्याचा आत्मसंतुष्टपणा सोडून देण्याची गरज आहे, पण तसे होताना दिसत नाही. जाती चिवट आहेत आणि जाती भावना बळकट आहेत आणि आता जागतीकीकरणाच्या कालखंडात जगभर बोकाळलेल्या संकुचित विचारांच्या अस्मितेचे वस्त्र लेवून जाती उभ्या आहेत. अशा वेळी आणखीनच अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर डोंबिवलीत पार पडलेल्या प्रस्थापित मराठी साहित्य संमेलनाला पु. भा. भावे नगर असे नांव दिले होते. पु. भा. भावे हे पक्के ब्राम्हण्यवादी साहित्यिक आहेत. आणि आज सत्तेवरही ब्राह्मण्यवादी आहेत. त्यामुळे यात आश्चर्य नाही. शिवाय डोंबिवली त्यांचा नेहमीचा बालेकिल्ला राहीला आहे. त्यामुळे. पु.भा. भावेंचे नांव येणे स्वाभाविक आहे. शिवाय यावेळी निवडून आलेले अध्यक्ष साहित्यिक आहेत की नाहीत ? याबद्दल संशय निर्माण झाला होता. ते पुरोगामी की प्रतिगामी ? अशी विशिष्ट प्रतिमा असलेले साहित्यिक नसल्यामुळे पु. भा. भावे यांच्या नावावर फार राडा झाला नाही.

अशा संमेलनात, या संमेलनाच्या तोंडावरच घडलेल्या सुप्रसिद्ध नाटककार, कवी असलेल्या राम गणेश गडकरी यांच्या पुण्यातील संभाजी उद्यानात असलेल्या पुतळ्याची तोडफोड केल्याची चर्चा होणे, त्याबद्दल ठराव येणे स्वाभाविकच होते. या घटनेकडे किंबहुना अशा घटनांकडे नेहमी सोप्या पद्धतीने पाहिले जाते. समाजकंटकांचे कृत्य, लोकशाहीविरोधी कृत्य अशी विशेषणे लावून अशा घटनांमागील सांस्कृतिक संघर्ष दडपला जातो. संभाजी ब्रिगेड काहीतरी माथेफिरू संघटना आहे अशा पद्धतीने पाहिले जाते. त्यामुळे ही संघटना पुढे आणू पहात असलेले विघातक जातीय राजकारण मागे पडते. ही संघटना जे वैचारिक आणि सांस्कृतिक राजकारण पुढे आणू पाहते त्यासाठी ती ज्या ऐतिहासिक सांस्कृतिक-वैचारिक झगड्याचा आधार घेते तो आपण तपासला पाहिजे. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात थेट १२व्या शतकापासून चक्रधरांनी सामाजिक समतेसाठी सुरू केलेल्या सांस्कृतिक, वैचारिक संघर्षाचे पडसाद थेट फुले-आंबेडकरांच्या आणि ब्राह्मण्येत्तर चळवळींच्या रूपात पाहता येतात. ब्राह्मण्येत्तर चळवळ याच संघर्षाचा भाग असली तरी तिची भूमिका ब्राह्मण्यवादाविरुद्ध नसून ब्राह्मणजातीविरुद्ध राहिली आहे. एका अर्थाने ती फुले-आंबेडकरांसारखी वैश्वीक मानवतावादी नव्हती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्राह्मणेत्तर चळवळीच्या या दृष्टीकोनाचा प्रतिवाद चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या वेळी केलेला आहे.

आज मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड आणि तत्सम मराठावादी संघटना ब्राह्मणेत्तर चळवळीचा हाच ब्राह्मणविरोधी वारसा चालवत आहेत. महाराष्ट्रात ब्राह्मण आणि मराठा या सत्ताधारी जाती राहिल्या आहेत. यामुळे त्यांच्या या संघर्षाला – सत्ता संघर्षाचेही परिमाण आहे. आज हिंदुत्वाच्या बुरख्याआड इतर ओबीसी जातींचे संघटन करून ब्राह्मण्यवाद सत्ता स्पर्धेत उतरला आहे. या पार्श्वभूमीवरही मराठावादाकडे पहावे लागेल. ते असो, आपल्याला इतकेच म्हणायचे आहे की, राम गणेश गडकरी यांच्या पुतळा तोड प्रकरणाकडे या पार्श्वभूमीवर पाहिले पाहिजे. राम गणेश गडकरी आणि आदरणीय संभाजी महाराज हे काही एकमेकांचे व्यक्तीगत शत्रू नाहीत. त्यामुळे जेव्हा राम गणेश गडकरी – आपल्या नाटकातून संभाजी महाराजांचे आक्षेपार्ह चित्रण करतात तेव्हा, संभाजी महाराज आणि राम गणेश गडकरी केवळ व्यक्ती राहत नाहीत तर एका विचारमूल्यांचे वाहक बनतात. संभाजी महाराज हे ब्राह्मण्य विरोधाचे प्रतिक म्हणून समोर येतात, तर गडकरी त्याच्या उलट विचारांचे प्रतिनिधी म्हणून समोर येतात.

'संभाजी ब्रिगेड' आपल्या संकुचित मराठावादी राजकारणासाठी वरील सांस्कृतिक संघर्षाचा फायदा उठवू पाहत आहे. खरे तर छत्रपती शिवाजी महाराजांना आणि संभाजी महाराजांना संकुचित करून मराठा जातीच्या अस्मितेचे प्रतिक म्हणून पुढे आणले जात आहे. प्रतिगामी ब्राह्मण्यवादी शक्तींनी शिवाजी महाराजांना केवळ मुस्लीमद्वेषाचे प्रतिक बनवले आणि आपली राजकीय पोळी शेकली, त्या पद्धतीने संभाजी ब्रिगेड करू पाहत आहे. पुतळे फोडणे, ग्रंथालये जाळणे हे फार शौर्याचे काम नाही. ते कोणीही माणूस करू शकतो. त्यासाठी छ. शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांनी जी जाती-धर्माची निरपेक्ष मूल्ये पुढे आणली, तो थोर वारसा बदनाम करण्याची गरज नाही. बाबासाहेबांनी 'मनुस्मृती' जाळली ती तिची सांगोपांग चिकित्सा करून, समतामूलक अवैदिक विचारांची भूमिका पुढे आणून. केवळ जात संघटन करून तात्कालीक फायद्यासाठी काही कृती करणे हे विचारांना पुढे घेऊन जाणारे नसते तर विचारांना बदनाम करणारे असते.

ब्राह्मण्येत्तर चळवळीच्या अपयशाची कारणे सांगताना बाबासाहेबांनी 'ब्राह्मणेत्तरांना ब्राह्मणांच्या बरोबरीने समता पाहिजे होती- दलितांच्या बरोबरीने नव्हे'. ती वास्तवता आजही आहे. आजही ब्राह्मणेत्तरांना दलितांबरोबर समता नकोच आहे. जाती अत्याचारात होणारी वाढ हेच दर्शवते आजही अनुलोम-प्रतिलोम पद्धतीनेच विचार केला जातो. राम गणेश गडकरींच्या पुतळा तोड प्रकरणात-आजही ब्राह्मण असणारेच लोक निषेधासाठी, कृती करण्यासाठी पुढे आले आहेत. निषेध सर्वांनीच केला अगदी शरद पवारांनीही, पण कृती करण्यासाठी वरील आडनावाचेच लोक पुढे आले, कलावंत पढे आले हीच गोष्ट आपल्याला 'जेम्स लेन' प्रकरणात दिसते. शिवाजी महाराजांचा या पुस्तकात अपमान केला गेला. त्याचा निषेध करायला बहुजन जातीच पुढे आल्या. पण भांडारकर संस्थेवर हल्ला झाल्यानंतर परत वरील आडनावाचेच लोक पुढे आले. ही फार आनंदाची गोष्ट नाही. हे आपल्या समाजाला ग्रासून राहिलेल्या जातीय आजाराचे लक्षण आहे. पण हे वास्तव आहे हे स्वच्छपणे मान्य करून मूल्यांच्या पातळीवर जाती पल्ल्याड जाण्यास शिकले पाहिजे.

दलित अत्याचारांच्या घटनात येणारा जातीय मतीमंदपणाचा अनुभव केवळ विदारक स्वरूपात असतो. बाबासाहेबांनी म्हणून ठेवले आहे की, 'लेनिन जर भारतात जन्माला आला असता तर त्याने जाती व्यवस्था नष्ट केल्याशिवाय क्रांतीचा विचारही केला नसता' वरील पार्श्वभूमीवर बाबासाहेबांचे विचार अगदी सत्य आणि योग्य वाटतात. म्हणून जातीअंत होईपर्यंत जाती अंताचा लढा लढत राहणे अगदी अटळ आहे. या लढ्यात महान लेनिन यांच्या क्रांतीकारी शौर्यशाली विचारांचा, कृतीचा वारसा रुजवणे हे आपले पुढील कार्य आहे. तोपर्यंत जाती हितसंबंधाचा हा निरर्थक आखाडा चालू राहील. ★ ★ ★

## <u>('नोटाबंदी' प्रगतीची संधी... पान १० वरून)</u>

गेला. माझ्या माहितीच्या एका सराफाच्या दुकानाची एका दिवसातील विक्री सतरा कोटीच्या वर गेली. स्टॉक एक्सचेंजमध्ये शेअर बाजारात, कन्स्ट्रक्शन (बांधकाम) उद्योगात, जमीन खरेदीत हा सारा इन्कमटॅक्स चुकवलेला काळा पैसा आहे.

नोटाबंदीबद्दल सरकारने गुप्तता बाळगली याबद्दल आमचे दुमत नाही. पण जोपर्यंत इन्कम टॅक्स बुडवला त्यांचा हात काढायला सरकार पुढाकार घेत नाही. तोपर्यंत काळा पैसा काढण्याची कारवाई संशयास्पद, नाटकी ठरेल. नोटाबंदीनंतर सोने आयातीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले. ते ९५० टनापर्यंत गेले. पूर्वी ते २०० ते ३४० टनापर्यंत होते. याचा अर्थ कर बुडवला गेलेला काळा पैसा सोन्यात गुंतवला गेला. हे सरकारच्या लक्षात आल्यावर नियंत्रणे आली. दर खाली आले असले तरी 'बैल गेला आणि झोपा केला' अशी अवस्था आली.

काळे धन नेमके सोन्यात किती, शेअर बाजारात परकीय चलनात किती आहे? याचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, ही आपली मागणी असली पाहिजे. उद्योग, वस्तुविनिमयातील काळा पैसा बाहेर निघाला पाहिजे. स्वीस बँकेतच केवळ भांडवलदार व कर बुडवणाऱ्यांचा काळा पैसा नसून, या बँकेपेक्षा कितीतरी मोठ्या अशा जगातील सत्तर ठिकाणी, कर बुडवेगिरीतून आलेल्या काळ्या पैशांचे आश्रयस्थान आहे.

सरकारच्या उक्ती आणि कृतीत खूप मोठे अंतर आहे. सरकार कारवाईला कचरते आहे. लोकांनीच पुढाकार घेणे ही आता काळाची गरज आहे. इन्कमटॅक्स ऑफिससमोर धरणे धरून, कर बुडवेगिरी करणाऱ्यांची नावे जाहीर करा! ही मागणी घेऊन चढाईचे धोरण लोकांनी अवलंबिले पाहिजे. वाघाने जबडा पसरला आहे. तो आता आपल्यावर हल्ला करणार आहे. हे दिसते आहे. अशा स्थितीत वाघावर हल्ल्याशिवाय सुटका नाही. अशी स्थिती आहे. त्यामुळे आता माघार नाही.या निर्धाराने उभे रहाण्याशिवाय लोकांच्या पुढे पर्याय नाही. संघटित व्हा, समजून घ्या आणि संघर्षाला सज्ज व्हा.

**(संकलन : व्ही. वाय. (आबा) पाटील)**

# भारतीय न्यायव्यवस्थेत कधी होईल मेक इन इंडिया?

ॲड. संजय पांडे

४ जानेवारी २०१७ रोजी भारताचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती जगदीश सिंह केहर यांनी पदभार सांभाळला, परंतु भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासाच्या पानांत माजी मुख्य न्यायाधीश टी.एस. ठाकूर नेहमी लक्षात राहतील. सहसा बहुतांश माजी न्यायाधीश सत्तेच्या जवळ असताना पदोन्नती आदी अनेक कारणांनी सत्तेची नाराजी माथ्यावर मारून घेत नाहीत. अनेकजण सेवानिवृत्त झाल्यानंतर कोणत्यातरी आयोग, समिती, प्रकल्प, विभाग किंवा मलईदार पदांवर नियुक्ती मिळविण्यासाठी सत्तेसोबत थेट लढा टाळतात.पण भारताच्या या माजी सरन्यायाधीशांनी वर्तमान केंद्र सरकारच्या 'अच्छे दिन'च्या दाव्याचा कित्येक वेळा खरपूस समाचार घेतला. न्यायमूर्ती ठाकूर यांनी न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत सरकारद्वारे 'मेमोरंडम ऑफ प्रोसीजर' अंतर्गत सरकार द्वारा राष्ट्रीय सुरक्षेचे कारण पुढे करण्यावर देखील टीका केली.

आज न्या. ठाकूर यांच्या विधानांचा राजकीय फायदा घेण्याचा अधिकार बहुतांश काळ सत्तेत राहिलेल्या काँग्रेस पक्षाला मुळीच नाही. १९८७ सालीच कायदे आयोगाने ४०,००० न्यायाधीशांच्या नेमणुकीची मागणी केली होती. त्यावेळी कायदे आयोगाचे म्हणणे होते की, 'आपल्या देशात दहा लाख लोकसंख्येसाठी केवळ दहा न्यायाधीश आहेत, पण गरज किमान ५० न्यायाधीशांची आहे. हा आकडा भविष्यात वाढता नेऊन पुढील २० वर्षांत म्हणजे वर्ष दहा २००६ पर्यंत १०० न्यायाधीश प्रति दहा लाख केला गेला पाहिजे.' परंपरेप्रमाणे परिस्थिती शिफारशी केल्यासारख्या बदलल्या नाहीच.

३ मार्च २०१३ रोजी आंध्र प्रदेश येथे 'राज्य न्यायसेवा प्राधिकरणा'च्या कार्यक्रमात भारताचे तेव्हाचे सरन्यायाधीश अल्तमश कबीर यांनी देखील हा मुद्दा उचलला आणि म्हटले की, 'लोकसंख्या वाढीच्या तुलनेत न्यायाधीशांची संख्या जैसे थे आहे'. त्यांनी वाढत्या केसेसची तुलना 'विना सेफ्टी व्हॉल्वच्या प्रेशर कुकर'शी केली. जस्टिस व्ही.व्ही. राव यांचे एक कथन भरपूर गाजले होते, त्यांनी आकडेवारी मांडली की, जर याच मंद वेगाने खटल्यांचा निकाल लागत राहिला तर सर्व खटले निकाली काढण्यासाठी ३२० वर्षे तरी लागतील, २०१३ सालीच महिला सशक्तीकरणासाठी नेमलेल्या कमिटीने महिला अत्याचारांवरील खटले वेगाने चालावे, त्यांना न्याय मिळावा व आरोपी सुटू नये म्हणून नमूद केले की, विकसित देशांत दहा लाख लोकांवर ५० आणि विकसनशील देशांमध्ये ३५-४० न्यायाधीश आहेत. काही देशांमध्ये तर ७०० न्यायाधीशांची गरज असतानाही ८०० स्थायी न्यायाधीश आहेत.

आज भारतात दर दहा लाख लोकसंख्येसाठी १८ न्यायाधीश आहेत, परंतु विकसनशील देशांच्या बाबतीत ही सरासरी ४० न्यायाधीश अशी दुपटीने जास्त आहे. त्यामुळे 'सुपरपॉवर' बनण्यासाठी न्यायव्यवस्थेतल्या रिक्त पदांबाबत काय करावे लागेल ? यांचा अंदाज आपल्याला अनेक देशांच्या आकडेवारीवरून येईल. दर दहा लाख लोकांसाठी अमेरिकेत - १०७, स्वीडन -१३०, चीन - १७०, बेल्जियम-२३०, जर्मनी -२५०, स्लोवेनिया-३९०, कॅनडा-७५, इंग्लंड-५१, ऑस्ट्रेलिया -४१ इतके न्यायाधीश आहेत. अशा तऱ्हेने भारतात लोकसंख्येच्या प्रमाणात न्यायाधीशांची संख्या विकसनशील देशांच्या मानाने देखील अतिशय कमी आहे. भारत आपल्या न्यायव्यवस्थेवर अर्थसंकल्पाचा केवळ ०.५ टक्के खर्च करतो. अमेरिका त्याच्या दुप्पटीपेक्षा जास्त खर्च करते. 'बीबीसी'ने या विषमतेवर एका अहवालात म्हटले आहे की, भारतात खटले अतिशय सावकाश चालतात. इथे दर दहा हजार लोकांवर ०.१४ न्यायाधीश आणि अमेरिकेत १ न्यायाधीश आहेत.

स्वत: कायदे आयोगाच्या वतीने मागील वर्षाच्या जानेवारी महिन्यात प्रसृत केलेल्या माहितीप्रमाणे भारताच्या २४ उच्च न्यायालयांमध्ये १०४४ न्यायाधीशांची गरज असतानाही केवळ ६०१ न्यायाधीशांना घेऊन काम चालवावे लागत आहे. ४४३ पदे भरलीच गेली नाहीत. ह्याचे सर्वात मोठे नुकसान अलाहाबाद उच्च न्यायालयाचे झाले आहे. उत्तरप्रदेशची लोकसंख्या आणि खटले दोन्हीही जास्त. तिथे ८६ न्यायाधिशांची पदे (५२ टक्के) रिक्त आहेत, आंध्रप्रदेश, येथे ६२ टक्के, पंजाब आणि हरियाणा येथे ३९ (४६ टक्के); मद्रास हायकोर्टाची ३८ पदे रिक्त आहेत. महत्वाची व चिंताजनक बाब म्हणजे; ८० टक्के बॅकलॉग हा उत्तरप्रदेश, प. बंगाल, तामिळनाडू, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश-तेलंगणा, आणि कर्नाटक यांसारख्या मोठ्या राज्यांचा आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, आंध्र-तेलंगणा, अलाहाबाद, पंजाब आणि हरियाणा, केरळ, मध्यप्रदेश, मणिपूर, पटना आणि राजस्थान उच्च न्यायालये उच्चन्यायाधीश किंवा प्रभारी उच्चन्यायाधीश यांविना काम करत आहेत. अशा प्रकारे वरिष्ठ न्यायालयांतील ४२ टक्के न्यायाधीशांची पदे भरली गेलेली नाहीत.

कनिष्ठ न्यायालयांची परिस्थिती देखील चांगली नाही. इथे ५००० न्यायाधीशांचा तुटवडा आहे. पंतप्रधानांच्या गृहराज्यात गुजरात येथे १,९३९ पैकी ७६९ (४० टक्के) न्यायाधीशांची पदे रिक्त आहेत. त्यामुळे तेथे न्यायालयीन कक्ष देखील गरजेपेक्षा कमी आहेत. १,९३९ कक्ष गरजेचे असून तेथे फक्त १,१८६ कक्ष आहेत. बिहार राज्यात १,७२७ पैकी ६६०, दिल्ली ७९३ पैकी ३०३ न्यायाधीशांची पदे रिक्त आहेत. उत्तरपूर्वेत देखील मेघालय येथे ५० टक्के पदे व त्रिपुरा राज्यातील ३५ टक्के पदे रिक्त आहेत.

वरिष्ठ आणि कनिष्ठ न्यायालयांतील या रिक्त पदांचा सरळ परिणाम खटले उशिरापर्यंत चालण्यात होतो. सर्वसामान्य माणूस हा 'न्याय उशीरा होणे म्हणजे न्याय नाकारणे' या प्रसिद्ध म्हणीप्रमाणे कचाट्यात सापडला आहे. वकिलांची फी भरून आणि कामाच्या उत्पादक वेळेचे नुकसान करून 'शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये' असल्या म्हणींवर विश्वास करू लागतो. त्याने कोणाकडे पहावे ते समजत नाही. परिस्थिती बिकट आहे. भारतात आजच्या घडीला ३.१० कोटी खटले चालू आहेत. दरवर्षी २ कोटी नवीन खटल्यांची त्यात भर पडते. जुलै २०१४ ते जुलै२०१५ या कालावधीत सुमारे १५,५५० न्यायाधीशांनी १८,६२५,०३८ खटले निकाली काढले. महालोकअदालतसारख्या तडजोडीच्या मंचांवर खटले वर्ग करून भार कमी करावा, यासाठी शासनातर्फे विविध पातळींवर आदेश-निर्देश आदी दबावही कमी अधिक प्रमाणात त्यांच्यावर येतो. पण नवीन खटले दाखल करणे सरकार थांबवू शकत नाही. त्यामुळे त्या वर्षभरातच निकाली काढलेल्या खटल्यांमध्ये काही हजारांची वाढ होऊन, त्यापेक्षाही अधिक खटले नोंदवण्यात आले.

मग आता काय करावे ? खटल्यांच्या संख्येत घट होईल तर कशी ? सरकार आणि न्यायाधीश हे लोक न्यायालयांच्या माध्यमातून खटले लवकर निकाली काढत असतांना आता सरकारच्या इतर खात्यांप्रमाणे इथे देखील सेवानिवृत्त न्यायाधिशांना मानधन तत्वावर पाचारण करण्यात यावे, अशी मागणी होऊ लागली आहे.

खटले आणि न्यायाधीशांची संख्या यांच्यातली नियोजनशून्यता व दरी पहायची असेल तर देशभरात मागील तीन दशकांमध्ये न्यायाधीशांचा आकडा ६ पट वाढत सुमारे १५,६०८ झाला आहे. परंतु खटल्यांचे प्रमाण १२ पट वाढले आहे. देशातल्या २३ उच्च न्यायालयांमध्ये ४४ टक्के आणि कनिष्ठ न्यायालयातील २३ टक्के पदे रिक्त आहेत. डिसेंबर २०१५ पर्यंत भारताच्या जिल्हा न्यायालयांत २.१५ कोटी आणि उच्च न्यायालयांमध्ये ३८.७६ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. वाढत्या साक्षरतेमुळे व अधिकारांच्या जाणीवेमुळे खटले दाखल करण्याचे प्रमाण वाढते आहे. आता पुढच्या तीन दशकांमध्ये केसेस १५ कोटींपर्यंत जातील, आणि तेव्हा आपल्याला ७५ हजार न्यायाधीशांची गरज असेल.

एका जुडिशियल अकादमीच्या उद्घाटन सोहळ्यात सरकारी नियोजनशून्यतेवर बोट ठेवत न्यायमूर्ती ठाकूर यांनी सुनावले की, १३६ न्यायिक अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी १६५ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आलेली अकादमी म्हणजे सार्वजनिक पैशांचे अपव्यय आहे. ते चुकीचेच नव्हे तर तो गुन्हा देखील आहे. कारण हा पैसा पिण्याचे पाणी, रस्ते, आरोग्य आणि स्वच्छता यावरचा खर्च कमी करून जमवण्यात आला आहे. त्यामुळे अशा सुविधेचा वापर इतर अधिकारी, अर्धन्यायिक कार्य, विद्यार्थी आणि जनतेसाठी केला गेला पाहिजे.

मे २०१६मध्ये न्यायमूर्ती ठाकूर यांनी अनेक राज्यांचे मुख्यमंत्री व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांच्या संयुक्त संमेलनात सरकारला आठवण करून दिली की, 'ट्रिब्यूनल्समध्ये गरजेच्या गोष्टींचा मोठा तुटवडा आहे. या रिकाम्या आहेत. मला माझ्या सेवानिवृत्त सहकाऱ्यांना तिथे पाठवताना दु:ख होते', न्यायतज्ञांसमोर न्यायाधीशांची संख्या २१,५४२ वरून ४० हजार करण्याची मागणी करतांना ते भावविवश झाले. त्यांनी सांगितले की, 'प्रकरणे हाताळण्यासाठी किमान ७०,००० न्यायाधीशांची आवश्यकता आहे. न्यायमूर्ती ठाकूर यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या कोलेजियम द्वारा शिफारशी केलेले नांव मान्य केल्यानंतर देखील ९ महिन्यांपासून पद न भरल्या जाण्याचे कारण देखील ॲटोर्नी जनरल यांना विचारले.

त्या दिवशी आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, 'ऑल इंडिया असोसिएशन' वि. 'युनियन ऑफ इंडिया' प्रकरणाच्या निकालाबद्दल न्यायाधीशांची संख्या पुढील ५ वर्षांमध्ये वाढवत नेत ५० न्यायाधीश प्रती दहा लाख लोकसंख्या केली गेली पाहिजे. 'रामचंद्र राव वि कर्नाटक राज्य' या दुसऱ्या एका महत्वाच्या खटल्यात ११व्या परिच्छेदात स्पष्ट म्हटले आहे की, प्रकरणांचा निकाल खूप उशीरा होण्याचे कारण न्यायाधीश व लोकसंख्येचे असमान प्रमाण आहे. एकाच वेळी न्यायव्यवस्था ही सर्वांच्या काळजीचा विषय आहे आणि त्याच वेळी ती कोणाच्याही काळजीचा विषय नाही.'

जून २०१४ साली जेव्हा रालोआ सरकार सत्तेत आले. तेव्हा रिक्त पदांची संख्या ३० टक्क्यांवरून आता ४३ टक्के झाली आहे. अशा परिस्थितीत सध्याच्या 'अच्छे दिनां'मध्ये घडणाऱ्या 'नोटाबंदी' संबंधित आयकर विषयक खटले, भ्रष्टाचार, दहशतवाद, बलात्कार व इतर प्रकरणे 'मैक्सिमम गवर्नंस्'च्या गोष्टी करणारे सरकार कशी हाताळणार ? हा प्रश्न न्या. तीरथसिंह ठाकूर मागे सोडून सेवानिवृत्त झालेत. पण परिस्थितीचे गांभीर्य सरकार ओळखण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. उलट सत्ताधारी भाजप पक्षाला मानणारी भक्त मंडळी समाज माध्यमात न्यायाधीशांचीच टिंगल करत आहेत. सरकारलाच न्यायव्यवस्थेत 'मेक इन इंडिया' करायचे आहे, याबाबत सरकारने विचार देखील केलेला नाही. त्यासाठी परदेशी कंपन्या कोणत्याही गुंतवणुकीचा करार करणार नाहीत. काँग्रेस आणि भाजप पक्षाच्या न्यायविषयक धोरणात कुठलाच फरक नाही, या बाबतीत कुठलीच शंका नाही.

★ ★ ★

## (जुबानी तलाक आणि... पान ८ वरून)

सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालाच्या विरोधात आवाज उठवण्यात इरेसरीने सर्वात पुढे होते. मुझफ्फरपूरमधील इमराना नावाच्या महिलेवर खुद्द तिच्या सास-याने बलात्कार केल्याची केस समोर आली, तेव्हा याच 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डा'ने तिने त्या बलात्कारी सासऱ्याच्याच बरोबर राहिले पाहिजे असे फर्मान काढले होते. पण आपण हेही लक्षात ठेवले पाहिजे की, 'ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड' म्हणजे साऱ्या भारतीय मुस्लिम जनतेचा एकमेव आवाज आहे असे मानायचे काहीच कारण नाही.

२००५ साली 'ऑल इंडिया मुस्लिम विमेन्स पर्सनल लॉ बोर्डा'ची स्थापना झाली. हे मुस्लिम महिलांचे अखिल भारतीय मंडळ जुबानी लोकप्रथेच्या विरोधात अतिशय ठाम भूमिका घेऊन मुस्लिम महिलांच्या समान हक्कांसाठी अव्याहत काम करत आहे. अनेक पुरोगामी मुस्लिम शिक्षण तज्ञ जुबानी तलाक प्रथेच्या विरोधात उभे आहेत आणि ही प्रथा नष्ट करावी असे आवाहन करीत आहेत. डाव्या पक्षांचा आणि एकूणच डाव्या विचारांच्या लोकांचाही त्यांना पाठिंबा आहे. हिंदूंमधील आणि अल्प संख्याकांमधील ही धर्मांध व्यक्ती व शक्तींच्या कटकारस्थानांपासून आपल्याला अत्यंत सावध राहिले पाहिजे. प्रश्न केवळ मुस्लिम स्त्रियांच्या हक्कांपुरता मर्यादित नाही. तो तर आहेच; पण त्याचबरोबर केवळ मुस्लिम स्त्रियांच्याच नव्हे तर सर्वच जातीधर्मांमधील स्त्रियांच्या समान हक्कांसाठी आपल्याला निकराने लढा द्यायचा आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून त्रिवार तोंडी तलाक प्रथेला नष्ट करण्याच्या मागणीला आपण भक्कम पाठिंबा दिलाच पाहिजे.

**(अनुवाद : डॉ. माया पंडित)**

## (रोहित वेमुला... पान ९ वरून)

असेही सांगितले. पोलिसांनीच त्यांना आपल्या गाडीतून आणले व झटकन बाजूला नेले.

याचा अर्थ सरळ आहे, राजा वेमुला आणि राधिका वेमुलानी जर खासगीरित्या रोहितच्या पुतळ्याला अभिवादन केले असते, तर त्यांना एखादे वेळेस परवानगी देण्यात आली असती, पण जाहीररित्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनांचा भाग म्हणून ती नाकारण्यात आली.

त्या संध्याकाळी तेथे जमलेल्यांनी त्या रात्री निराशा आपल्याबरोबर नेली नाही तर गेले वर्षभर शहरी-ग्रामीण भारताच्या सीमा तोडत उत्तर प्रदेश ते दिल्ली ते गुजरात आणि हैद्राबाद अशा विविध भागात द्वेषातून होत असलेल्या गुन्हेगारी कृत्यांच्या विरोधात होत असलेल्या ऐक्याचा संदेश आपल्याबरोबर नेला.

या एकत्र आलेल्या लोकांवर झालेल्या अन्यायाच्या जखमा ताज्या आहेत. पण त्याविरोधात ऐक्याने उभे राहाण्यातील प्रचंड सामर्थ्य त्यांना जाणवले आहे, जे अखेरीस देशाच्या सार्वजनिक, खासगी, राजकीय आणि सामाजिक अवकाशात पसरणार आहे.

**(अनुवाद : राजीव देशपांडे)**